…क्युलर ट्रान्सलेशन सोसायटी

# महाराज रणजितसिंग

यांचें

# चरित्र.

च-२९०

किंमत ८ आणे.

२/१७६५

डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्सलेशन सोसायटीनें
पसंत करून बक्षीस दिलेलें

# महाराज रणजितसिंग यांचें चरित्र.

हें

**भिकोबा अनंत प्रधान**

यानीं लिहिलें

तें

**मुंबईंत**
तत्त्वविवेचक छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

आवृत्ति पहिली.

हें पुस्तक इ. स. १८६७ च्या पंचवीसाव्या ॲक्टाप्रमाणें
रजिष्टर केलें असे.

सन १९०७.

किंमत ८ आणे.

ह्या पुस्तका संबंधीं सर्व हक्क कर्त्यांनें आपल्या
स्वाधीन ठेविले आहेत.

# प्रस्तावना.

आमच्या लोकांत विद्येची अभिरुचि लागून ऐतिहासिक ज्ञानाचा प्रसार जितका व्हावयास पाहिजे तितका झाला नसल्यानें जगांत जीं रानटी स्थितींत राष्ट्रें आहेत त्यांपैकींच आमचा हिंदुस्तान देश अद्यापि आहे असें ह्मटल्यास अन्यथा होणार नाहीं. सांप्रत आम्हांस पाश्चात्त्य विद्यादानाचा लाभ आमच्या दयाळू सरकाराकडून मिळत आहे खरा, व तेवढ्या वरून आम्ही फुगून जाऊन मध्येंच उडी मारण्याचा यत्न करितों, परंतु ती आमची उडी कुंपणावरील सरड्याच्या उडीप्रमाणें आहे किंवा काय याचा मात्र विचार आमच्या मनांत येत नाहीं. याकरितां अशा प्रकारचें ज्ञान आम्ही नुसत्या घोकंपट्टीनें मिळविण्याच्या नादीं न लागतां तें प्राचीन व आर्वाचीन इतिहासज्ञांनीं केलेले ग्रंथ वाचून व त्यांचें चांगलें परिशीलन करून मिळविलें पाहिजे. इतकेंच नाहीं तर आमच्यांतील आधुनिक विद्वानांच्या लेखणींतून या विषयावर अनेक लेख व ग्रंथ समूहही तयार झाला पाहिजे. हा ग्रंथसमूह अमुकच प्रमाणावर असावा असें नाहीं. लहान लहान ग्रंथ जरी असले तरी त्यांची ऐतिहासिक ज्ञान भांडारांत थोडीबहुत भर पडल्यावांचून राहणार नाहीं असें खास वाटतें. अस्तु.

वरील हेतु मनांत आणून मी हा चरित्ररूपी अल्पसा लेख लिहिण्याचें काम हातीं घेतलें. हें चरित्र म्हणजे, हिंदुस्तानच्या उत्तरेकडील भागांत **रणजितसिंग** नांवाचा एक रजपूत शीख एकोणिसाव्या शतकास प्रारंभ होऊन कांहीं

वर्षें लोटल्यावर प्रसिद्धीस येऊन त्यानें स्वपराक्रमानें त्या भागांतील लोकांस थक्क करून सोडिलें, त्याचें कथानक होय. अशा पुरुषाचें महाराष्ट्रभाषेंत अल्पस्वल्प तरी चरित्र असून तें आबालवृद्धांच्या नजरेखालून जावें अशी उत्कटेच्छा माझ्या मनांत बिंबल्यापासून मीं प्रस्तुत यत्न करण्याचें धाडस केलें; परंतु ग्रंथलेखनासारखें अति जोखमाचें काम प्रथमतःच आपल्या शिरावर घेतल्यामुळें तें मला कितपत साधलें आहे याची शंका आहे. दुसरें असें कीं, अशा प्रकारच्या ग्रंथ-रचनेस साग्र व खरी माहिती मिळण्याकरितां द्रव्यबलाचें विशेष साधन लागतें, आणि त्याचा तर मजजवळ पुष्कळच अभाव आहे; तथापि मुलतान, लाहोर व अमृतसर इत्यादि ठिकाणांहून कांहीं विश्वसनीय अशी माहिती मिळवून विशेषतः **सरलिपेल ग्रिफीन्** या इंग्रज मुत्सद्यानें व ग्रंथकारानें केलेले " पंजाबांतील राजे व सरदार " वगैरे ग्रंथांवर भरंवसा ठेवून त्यांच्या आधारानें हें चरित्र लिहिलें आहे, व त्याबद्दल सर साहेबांचा मी फारच आभारी आहें.

शेवटीं माझी अशी प्रार्थना आहे कीं, हा चरित्ररूपी लेख केवळ माझा ' ओ ना मा ' असून तो मी आपल्या विद्वान् मित्रांपुढें ठेवीत आहें; म्हणून त्यांनीं हें पुस्तक समग्र वाचून त्यांतील दोष व इतर जास्त माहिती मजवर कृपा करून कळविल्यास मी त्याप्रमाणें सुधारणा करीन असें म्हणून हा प्रस्तावना लेख येथें पुरा करितों.

**श्रीवर्धन**, संस्थान जंजिरा. पुस्तक कर्त्ता,<br>
मिति चैत्र शुद्ध० १ शके १८२६ **भि० अ० प०.**

# महाराज रणजितसिंग यांचें चरित्र.

## भाग १.

शीखधर्म–त्याचा उत्पादक–त्यांतील बारा मिसली–त्यांचा एकमेकींशीं संबंध–चरत्सिंग–महान्सिंग–कन्हैय्या हमीरसिंग–बटाला येथील लढाई–रणजित्सिंगाचा जन्म–त्याचें लग्न–महान्सिंगाचा सोध्रानच्या किल्ल्यास वेढा–त्याचा पराभव व मृत्यु–इ०

या भरतखंडांत फार प्राचीन काळापासून जसे अनेक धर्मपंथ व अनेक जातिभेद झाले आहेत तसे पृथ्वीवरील दुसऱ्या कोणत्याही देशांत नाहींत हें आपणांस इतिहासदृष्ट्या पाहिलें असतां सहज कळून येण्याजोगें आहे. ह्याचें कारण या अफाट देशांत पूर्वीं जे जे मोठे पराक्रमी बादशाह व राजे किंवा शूर पुरुष होऊन गेले, त्यांचें लक्ष धर्मसंस्थापनेकडे विशेष असल्यामुळें त्यांनीं जो जो मुलूख पादाक्रांत केला त्या त्या मुलखांत आपल्या मताप्रमाणें नवीन धर्माची स्थापना केली. अशा प्रकारचा नवीन धर्मपंथ ‘नानक’ या क्षत्रिय पुरुषानें पंजाबप्रांतीं पंधराव्या शतकाच्या सुमारास स्थापिला. त्यानें असें केलें कीं, हिंदू व मुसलमानी ह्या दोन्ही धर्मांतील शुद्ध तत्वें निवडून काढून तीं पूर्णपणें प्रथमतः आपण स्वीकारिलीं. नंतर त्यांचा प्रसार हळूहळू त्या प्रांतांत करवून त्यानें या पंथास ‘धर्म’ अशी संज्ञा दिली. नानक हा क्षत्रियकुलोत्पन्न असल्यामुळें त्याच्या अंगीं शौर्य वसत होतें, व त्याच्याजवळ अनुयायीही बरेच जमले होते. त्यानें आपल्या शिष्यांस आपण काढि-

लेलीं धर्मतत्त्वें शिकविलीं त्यावरून या नवीन धर्मास 'शीखधर्म' ( शिष्यधर्म ) असें नांव प्राप्त झालें, आणि तदनुयायी लोकांस ' शीख ' ( शिष्य ) असें म्हणण्याचा पाठ पडला; तो अद्यापि कायम आहे. शीख लोकांचें जें धर्मपुस्तक आहे त्यास ' आदिग्रंथ ' अशी संज्ञा आहे. हिंदू लोकांत जसे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र असे चार वर्णभेद आहेत तसे शीखलोकांतही फुलकियन, अहलुवालिया, भांगी, कन्हैया, रामगढिया, सिंगपुरिया, करोरासिंगिया, निशाणिया, सुकरचकिया, दुलेलवालिया, नक्काईद आणि शाहीद असे बारा वर्णभेद म्हणजे मिसली आहेत. या सर्व मिसलींतील लोक एकाच ठिकाणीं राहत होते असें नाहीं. त्यांचा परस्परांमध्यें वर्णभेदामुळें एकोपा मुळींच नव्हता. वरील बारा मिसलींपैकीं अहलुवालिया, भांगी, कन्हैया, रामगढिया, सुकरचकिया व नक्काईलोक सतलज नदीच्या उत्तरप्रांतीं राहत असत व अद्यापिही त्याच प्रदेशांत त्या लोकांची वस्ती बरीच आहे. बाकी राहिलेल्या सहा मिसलींतील लोक त्याच नदीच्या दक्षिणप्रांतीं राहतात.

असो. याप्रमाणें शीखधर्माविषयीं व लोकांविषयीं थोडक्यांत विवेचन करून आमचा सुप्रसिद्ध योद्धा व चरित्रनायक महाराज रणजित्‌सिंग याच्या पूर्वजांचें अल्पचरित्र आम्ही प्रथमारंभीं वाचकांस सादर करितों.

वरील सुकरचकिया मिसलींत 'महान्‌सिंग ' नांवाचा सानसी नामक जाटकुळांत एक मोठा शूर व लौकिकवान् पुरुष सुमारें अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत होऊन गेला. त्याचा बाप 'चरत्‌सिंग' याणें लाहोर येथील अफगाण सुभेदार 'उबेदखान' याजबरोबर कित्येकवेळां मोठ्या निकराच्या लढाया

मारून त्यास अगदीं जर्जर करून सोडिलें व शेवटीं त्यास त्या प्रांतांतून हांकूनही लाविलें; नंतर पुढें कांहीं दिवसांनीं चरत्सिंग आजारी पडल्यामुळें लढाईसारखीं मोठ्या हिमतीचीं कामें त्याच्या हातून होतनाशीं झालीं व तो अगदीं थकून गेला होता म्हणून त्याची जहागीर 'गुजरानवाला' येथें होती तेथें आयुष्याचे दिवस घालवावे या हेतूनें तो जाऊन राहिला; परंतु थोडक्या दिवसांनीं तेथें त्याचा अंत झाल्यावर त्याचा पुत्र वरील महान्सिंग हा आपली जहागीर पाहूं लागला. त्यासमयीं त्याचें वय अवघें ११ वर्षांचें होतें; तथापि त्यानें आपले मित्र व नातलग यांच्या साहायानें आपली जहागीर संभाळून लाहोर येथें त्यावेळीं उत्पन्न झालेलीं लहानसान बंडें मोडून टाकिलीं. इ. स. १७७४ त 'झींद' येथील राजा 'गजपतसिंग' याच्या 'राजकुवर' नामक कन्येबरोबर त्याचें लग्न झालें. हा लग्नसमारंभ मोठ्या थाटाचा झाला; तथापि तो सिद्धीस जाईपर्यंत त्यांत अनेक तंटेबखेडे उत्पन्न झाले होते. त्यांचा परिणाम शेवटीं असा झाला कीं, गजपतसिंगानें 'नाभा' येथील 'हमीरसिंग' राजास कैद करून त्याच्या प्रांतावर स्वारी केली आणि त्याचा बहुतेक भाग आपण बळकावून बसला.

महान्सिंग फार लोभी व कपटी होता. त्यानें 'जम्मू' प्रांत बळकाविण्याकरितां अनेक युक्त्या योजिल्या होत्या; त्यांपैकीं शेवटची युक्ति अशी होती कीं, इ. स. १७८० त तेथील राजा मरण पावून त्याच्या पश्चात् त्याच्या गादीवर 'ब्रिजलालदेव' हा बसला. ब्रिजलालदेवास, भांगी सरदारांनीं त्याचा कांहीं मुलूख बळकाविला होता म्हणून, त्यांचें पारिपत्य करावयाचें होतें; याकरितां त्यानें आपल्या मदतीस महान्सिं-

गास बोलाविलें, आणि उभयतांचा स्नेहसंबंध कायम राहावा म्हणून त्यांच्यांतील पूर्वापार वहिवाटीप्रमाणें त्यांनीं परस्परांच्या पागोट्यांची अदलाबदल केली. महान्‌सिंगास तें पाहिजेच होतें; कारण अशा रीतीनें तरी आपला हेतु तडीस जावा असें त्याच्या मनांत फार होतें. या उभयतांचा वरप्रमाणें स्नेह जडल्यानंतर ब्रिजलालदेवानें कन्हैया मिसलीचा मुख्य राजा हकीकत्‌सिंग यासही आपल्या कुमकेस बोलाविलें; तेव्हां या त्रिवर्गांनीं मिळून त्या भांगी सरदारांची खोड मोडून ब्रिजलालदेवास त्याचा गेलेला मुलूख परत मिळवून देण्याचा निश्चय केला; परंतु जेव्हां ऐनवेळीं ब्रिजलालदेवाचा पक्ष सोडून देऊन जम्मू शहरावरच कन्हैया हकीकत्‌सिंगानें चाल केली तेव्हां त्याचें कपट दृष्टीस पडून ब्रिजलालदेवाचे डोळे उघडले व त्यास दरसाल पन्नास हजार रुपये देण्याचें कबूल करून प्रसंग टाळावा लागला. हकीकत्‌सिंगाचें हें कृत्य महान्‌सिंगास आवडलें नाहीं, म्हणून त्यानें ब्रिजलाल देवाचा पक्ष कायम धरून हकीकत्‌सिंगास हात दाखविण्याचा विचार केला. परंतु हकीकत्‌सिंग पुढें थोडक्याच दिवसांनीं मरण पावला, त्यामुळें त्याचा क्रोधाग्नि तसाच धुमसून राहिला.

महान्‌सिंगानें ब्रिजलालदेवाशीं शपथ वाहून त्याचें मित्रत्व संपादिलें होतें असें वर सांगितलें आहे; तथापि पुढें कांहीं दिवसांनीं त्या उभयतांत चुरस उत्पन्न झाली; तेणेंकरून महान्‌सिंगानें आपला हेतू सिद्धिस नेण्यास ही संधी बरी आहे असें जाणून जम्मू शहरावर एके दिवशीं अकस्मात् हल्ला करून तें लुटलें आणि तेथील राजवाड्यास आग लावून तो जाळून टाकिला. नंतर महान्‌सिंग गुजरानवाला येथें परत आल्यावर त्यास त्याचवर्षी

म्हणजे इ० स० १७८० त पुत्ररत्न प्राप्त झालें व तेंच रत्न उत्तरोत्तर आमच्या देशाच्या इतिहासास प्रकाशीत करितें झालें. असो. तदनंतर महान्‌सिंगानें 'काटक' येथील राजा संसारचंद व रामगढिया मिसलीचा मुख्य 'जस्सासिंग' या दोघांस विनंती करून आपल्या पक्षास सामील करून घेतलें. त्याचा असें करण्याचा हेतू इतकाच होता कीं, त्याच्या धुमसत असलेल्या क्रोधाग्नीस कन्हैया हमीरसिंगाचा पुत्र राजा 'जयसिंग' याच्या प्राणाची पूर्णाहुती द्यावयाची होती. हा जयसिंग फार शूर व लढाईच्या कामीं वाकबगार असा होता. त्यामुळें त्याचा लढाईंत पाडाव करणें महान्‌सिंगास फार कठीण होतें; तथापि त्यानें वरील दोघां राजांसह इ० स० १७८४ त 'बटाळी' येथें जयसिंगाबरोबर लढाई दिली. तींत जयसिंगाचा दुर्दैवानें मोड होऊन अतिशय नुकसान झालें. शेवटीं त्या उभयपक्षांत तह होऊन त्यांत असें ठरलें कीं, "काटक येथील राजापासून जयसिंगानें पूर्वीं घेतलेली 'कांगरादरी' त्याची त्यास परत द्यावी व जस्सासिंग रामगढीयाचें जें कांहीं पूर्वीं घेतलें असेल तेंही त्यानें त्यास परत द्यावें; आणि सुकरचकिया व कन्हैय्या या दोन मसलींतील पूर्वापार चालत आलेला वैरभाव नाहींसा होण्याकरितां जयसिंगानें आपला मुलगा गुरुबक्षसिंग याची अल्पवयी कन्या 'महताब कुबर' महान्‌सिंगाचा मुलगा 'रणजित्‌सिंग यास द्यावी." याप्रमाणें तहनामा झाल्यानंतर सदहू दोन मिसलींत जो पूर्वीपासून बेबनाव होता त्यास कांहींसा आळा पडला.

इतक्यानें महान्‌सिंग संतुष्ट झाला नाहीं. त्यास त्याचे आणखी दुसरे जे भांगी राजे व सरदार शत्रू होते, त्यांजब-

रोवर झुंजावयाचें होतें; म्हणून त्यानें बटाला येथील लढाई झाल्यानंतर वर सांगितल्याप्रमाणें रणजित्‌सिंगाचें इ० स० १७८६ त जयसिंगाच्या नातीबरोवर लग्न लावून देऊन आपण आपल्या उद्योगास लागला. इतक्या अल्पवयांत लग्न करण्याची रूढी शीख व रजपूत लोकांत पूर्वींपासून प्रचारांत होती व अद्यापिही कोठें कोठें आढळते; तरी पण असा प्रकार आतां हळूहळू कमी होण्याची पुष्कळ आशा आहे. असो. महान्‌सिंगानें इ० स० १७९२ त भांगी राजांत अतिशय बलिष्ठ राजा 'साहेबासिंग' यास जिंकण्याची तयारी केली. हा साहेबसिंग महान्‌सिंगाचा प्रत्यक्ष मेहुणा होता; तथापि क्षत्रिय ब्रीदास अनुसरून महान्‌सिंगानें आपण मरेपर्यंत त्याची पाठ सोडिली नाहीं. त्याच्या मनांत साहेबसिंगाचें आवडतें शहर जें 'गुजरात' तें घेण्याचें फार होतें; परंतु साहेबसिंगानें 'चुनियट' येथील भांगी सरदारास बरोबर घेऊन सोध्रान येथील किल्ल्यांत महान्‌सिंग असतां त्यास वेढा दिला. असें झालें तरी महान्‌सिंग न डगमगतां वेढा देणाऱ्यांच्या आंगावर धैर्यानें चालून आला; परंतु दैववशात् असें झालें कीं, तो ज्या हत्तीवर बसला होता त्या हत्तीवरून एकाएकीं घेरी आल्यामुळें तो खालीं पडला, तेव्हां त्याच्या एका चलाख हुजऱ्यानें त्यास तसेंच उचलून चोरवाटेनें किल्ल्याच्या बाहेर आणिलें. नंतर आपला धनी नाहींसा झाला असें पाहून महान्‌सिंगाच्या सैन्यानें किल्ला शत्रूच्या स्वाधीन केला. इकडे महान्‌सिंगास त्याच्या हुजऱ्यानें मूर्छितावस्थेंत किल्याबाहेर आणिल्यावर त्यास 'गुजरानवाला' येथें बंदोबस्तानें आणिलें; पुढें तीनच दिवसांनीं त्याचा तेथें अंत झाला. यावेळीं त्याचें वय अवघें २७ वर्षांचें होतें.

---

## भाग २.

रणजित्सिंग आपल्या जहागिरीचा कारभार पाहूं लागतो—त्याच्या सासूचा व त्याचा बेबनाव—त्याची आई राणी 'राजकुवर'—तिचा परम स्नेही 'लखपतराय'—कैठल येथील स्वारी—लखपतरायाचा मृत्यु—राजकुवरचें गुप्तपणें निघून जाणें—झेमानशहावर स्वारी—लाहोर शहर काबीज करणें—झेमानशहाचें कपट—त्याचा परिस्फोट—रणजित्सिंगाचें दुसरें लग्न—त्यानें आपणास 'राजा' म्हणवून घेणें—भांगी सरदार साहेबसिंग व गुलाबसिंग—त्यांचा गुप्तकट—बसन येथील दरबार—सदाकुवरचें कंपनी सरकारच्या आश्रयास जाऊन राहण्याचें कारस्थान—वगैरे.

महान्सिंग अकालीं मृत्यु पावला, म्हणून त्यावेळच्या त्याच्या दरबारी लोकांस अतिशय दुःख झालें. त्यांस सुकरचकिया मिसलीचा एक भक्कम खांब नाहींसा झाला असें वाटून आतां यापुढें या मिसलीचा कारभार कसा चालेल व शत्रूंच्या हातून आपला बचाव कसा होईल ही काळजी वाटूं लागली. गुजराणवाला येथील जहागिरीचा वारस म्हटला म्हणजे आतां आमच्या चरित्रनायकाशिवाय दुसरा कोणी नव्हता हें उघड आहे. परंतु तो अल्पवयी केवळ १२ वर्षांचें मूलच होतें; यामुळें राज्यकारभारासारखें महत्वाचें व जोखमाचें काम त्याच्यानें कसें हांकवेल ही शंका सर्वत्र उत्पन्न झाली. याकरितां सर्व सरदार लोकांनीं रणजित्सिंगाच्या सासूच्या म्हणजे 'सदाकुवर'च्या मदतीनें तो राज्यशकट चालविण्याचा बेत केला. कारण रणजित्सिंगास त्यावेळीं

श्वशुरगृहाशिवाय दुसरा कोणताही आधार नव्हता. सदाकुवर ही मोठी मानी व कारस्थानी स्त्री होती. तिनें आपला जांवई अज्ञान आहे असें पाहून व त्याची आईही कांहीं निराळ्या स्वभावाची आहे असें लक्षांत आणून त्या दरबारांत दुफळी झाली नाहीं तोंच त्यांत आपला प्रवेश व्हावा या हेतूनें होईल तितक्या त्वरेनें गुजराणवाला येथील कारभार आपल्या हातीं घेण्यास तिनें बिलकुल विलंब लाविला नाहीं. ती गुजराणवाला येथें आल्यावर तिनें प्रथमदर्शनींच दरबारी लोकांस निमंत्रण करून त्यांस सदुपदेशाच्या चार गोष्टी सांगितल्या व त्यांच्या स्वभावाचें चांगल्या रीतीनें परीक्षणही केलें. नंतर दिवसेंदिवस दरबारी लोकांवर व लहानसान लष्करी अमलदारांवर आपली करडी नजर ठेवून त्यांजवर तिनें आपला पुरा अंमल बसविला; त्या योगानें तिचें प्राबल्य उत्तरोत्तर अधिकाधिक वाढूं लागलें; परंतु रणजित्सिंग जसजसा प्रौढावस्थेंत येऊं लागला तसतसा तो दरबारांत स्वतः मन घालून व तत्संबंधानें माहिती करून घेऊन आपल्या लष्कराचा चांगला बंदोबस्त करण्याकडे लक्ष देऊं लागला. तेव्हां हें त्याचें कृत्य आपल्यास विघातक होईल असें त्याच्या सासूस वाटल्यावरून तिनें रणजित्सिंगाचे जे कोणी अंतस्थ हितचिंतक होते त्यांचा बारीक रीतीनें शोध करून व त्यांस दहशत घालून बंदोबस्त केला; त्यामुळें रणजित्सिंगास दरबारच्या कामीं लक्ष देण्यास बराच व्यत्यय येऊं लागला.

इ० स० १७९३ पासून इ० स० १७९६ पर्यंत रणजित्सिंगानें आपण होऊन स्वतंत्रपणें कोणतेंच कृत्य केलें नाहीं, तथापि इ. स. १७९७ पासून त्याची अंगची कर्तबगारी जागृत होऊं लागली. त्याच्या मनांत आपल्या दरबारांत

आपली सासू व आई हे दोन कांटे आहेत ते कसे तरी काढून टाकून आपण स्वतंत्रपणें राज्यकारभार पहावा असें आलें. कारण सदाकुवरचें वजन त्यावेळीं राज्यकारभारांत व सरदार वगैरे लोकांवर वाजवीपेक्षां जास्त पडूं लागल्यामुळें तें दरबारी लोकांस अर्थात् सहन न होऊन त्यांनीं त्या संबंधाची बरीच वाटाघाट चालविलेली रणजित्‌सिंगाच्या कानावर आली होती, व तसेंच त्यास आपल्या आईच्या पातिव्रत्याविषयींही संशय आला होता. त्याच्या आईच्या ( राजकुवरच्या ) खानगीकडे कोणी ‘ लखपत्‌राय ’ नांवाचा मनुष्य होता, त्यावर तिची अत्यंत प्रीति जडली होती. लखपत्‌राय हा फार दुराचारी व कपटी मनुष्य होता. त्यानें रणजित्‌सिंगाच्या हातीं राज्यसूत्रें आल्यावर तो आपल्यास जिवंत ठेवणार नाहीं असें पूर्वीच भाकीत करून ठेविलें होतें. रणजित्‌सिंगानें वरकरणी निमित्त करून “ कैठल ” येथील स्वारीवर जाण्याची लवकरच तयारी केली; परंतु आपण स्वतः त्या मोहिमेवर न जातां तें काम आपल्या एका सरदारावर त्यानें सोंपविलें, आणि राणी राजकुवरपासून लखपत्‌रायास स्वारीबरोबर जाण्याकरितां मागून घेतलें. राजकुवरच्या मनांत आपला व आपल्या प्रीतिपात्राचा वियोग व्हावा असें नव्हतें; तथापि रणजित्‌सिंगानें फारच आग्रह धरिल्यामुळें तिला त्याचा शब्द बाह्यात्कारें तरी मोडवेना. राजकुवरचा लखपत्‌रायास मोहिमेवर नेण्याबद्दल रुकार मिळाल्यामुळें रणजित्‌सिंगास अत्यानंद झाला व त्यास असें वाटलें कीं, आपला शत्रू आतां पुन्हां परत येण्याची आशा नको; कारण लखपत्‌राय लढाईच्या कामीं अगदीं निरुपयोगी मनुष्य होता हें त्यास पूर्णपणें माहीत होतें. असो. लखपत्-

रायास राजकुवरपासून दूर करण्याची जी ही शक्कल रणजित्‌सिंगानें काढिली तिचा शेवट कैठळ येथील लढाईंतच त्याच्या मरणांत झाला; परंतु ह्या गोष्टीचें खापर रणजित्‌सिंगाच्याच कपाळीं फुटलें. ह्याचें कारण, रणजित्‌सिंगानें बुद्धया स्वारीचें निमित्त करून लखपत्‌रायास मारेकऱ्यांकडून ठार मारविलें असें राणी राजकुवरनें प्रसिद्ध केलें. नंतर कांहीं दिवसांनीं राणी राजकुवरही गुजराणवाला येथून गुप्त रीतीनें कोणीकडे निघून गेली तिचा पुढें थांग किंवा पत्ता सुद्धां कोणास उमगला नाहीं. त्यावरून तत्पक्षियांनीं तिलाही खुद्द रणजित्‌सिंगानें मारिलें असावें असा त्यावर आरोप आणिला; परंतु ह्या दोन्ही गोष्टींत मुळींच तथ्य नाहीं असें म्हणावें लागतें; कारण या संबंधानें 'सर लिपेल ग्रिफिन' नामक एक इंग्रज ग्रंथकार असें म्हणतो कीं, "वरील दोन्ही अपवादांस मुळींच आधार नाहीं, कारण रणजित्‌सिंगाच्या स्वभावाविषयीं जें काय मला खात्रीपूर्वक समजलें आहे त्यावरून तो इतका साहसी व अविचारी असावा असें मला बिलकूल वाटत नाहीं."

वर सांगितल्याप्रमाणें रणजित्‌सिंगानें, स्वतः अथवा पर्यायानें कां होईना, आपली दुराचारी आई राणी राजकुवर व तिचें प्रेमपात्र लखपत्‌राय या उभयतांची कायमची व्यवस्था लाविल्यावर त्यास आपल्या सासूचेंही पारिपत्य करावयाचें होतें; परंतु तें काम त्यानें कांहीं दिवसपावेतों तसेंच लांबणीवर टाकिलें. ह्याचें कारण त्यावेळीं दरबारांत तिचें प्राबल्य जास्त वाढल्या कारणानें दरबारचे लोक आपल्यास या प्रसंगीं अनुकूल होतील किंवा नाहीं ह्याविषयीं त्यास शंका होती. ह्याकरितां तो बेत रहित करून त्यानें

एका नव्या स्वारीवर जाण्याची जंगी तयारी चालविली. ही मोहीम लाहोर येथील अफगाण सरदारावर होती. हा अफगाण सरदार कोण वगैरे जाणण्याची आमच्या वाचकांस जिज्ञासा असणें साहजिक आहे व ती पूर्ण करणें आमचें कर्त्तव्य आहे; म्हणून आम्ही तत्संबंधानें ह्याखालीं त्याचें थोडेंसें दिग्दर्शन करितों.

इतिहासप्रसिद्ध अहमदशाहा अबदल्लीचा नातू "झेमान-शाहा" इ. स. १७८३ त काबूल येथें गादीवर बसला. त्यानें इ. स. १७९५ त पहिल्यानेंच पंजाबप्रांतावर स्वारी करून झेलम नदीच्या दक्षिणतीरापर्यंतचा मुलूख काबीज केला. नंतर त्यानें इ. स. १७९७ व त्याच्या पुढच्या वर्षी पुन्हां त्या प्रांतावर स्वारी करून त्यावेळीं शीख लोकांच्या ताब्यांत असलेलें लाहोर शहर हस्तगत करून घेतलें. त्या-समयीं कित्येक शीख सरदारांच्या मनांत झेमानशहाबरोबर तह करून व त्यास कांहीं खंडणी देण्याचें कबूल करून त्याजपासून लाहोर शहर परत घ्यावें असें आलें; परंतु रणजित्‌सिंगासारख्या शूर व निग्रही मनुष्यास तें कसें पसंत पडणार? ह्यावेळीं त्याचें वय सारें १७ वर्षांचें होतें, तथापि त्याची कुशाग्र बुद्धि व स्वातंत्र्यप्रीति ह्या दोहोंचें सम्मीलन त्याच्या अंत:करणांत झाल्यामुळें त्यानें त्या शीख सरदारांच्या म्हणण्यास रुकार न देतां उलट त्यांपैकीं कित्येकांची निर्भ-र्त्सना केली व कित्येकांस चांगलें प्रोत्साहन दिलें आणि त्यांच्या साहायानें आपलें लष्कर चांगलें तयार करून झेमान-शहावर चालून जाण्याची तयारी केली. नंतर लागलीच आपल्या हाताखालच्या एका विश्वासू सरदाराबरोबर कांहीं सैन्य देऊन त्यास सतलजनदीच्या दक्षिणेकडील प्रांत

उद्ध्वस्त करून टाकण्याकरितां रवाना केलें. इतक्यांत दैवयोगानें असें घडून आलें कीं, अफगाणिस्थानांत एकाएकीं कांहीं राज्यप्रकरणीं गडबड उडाल्याचें झेमानशहास समजल्यावरून त्यास तिकडील बंदोबस्ताकरितां जाणें भाग पडलें. तेणेंकरून रणजित्‌सिंगास व दुसऱ्या शीखसरदारांस प्राणनाश झाल्याशिवाय लाहोर शहर आपल्या ताब्यांत घेण्यास अर्थात् चांगलीच संधी मिळाली. तेव्हां झेमानशहानें हें जाणून रणजित्‌सिंगास फसविण्याची एक मसलत काढिली, ती अशी. त्यानें काबुलाहून रणजित्‌सिंगास निरोप पाठवून कळविलें कीं, "मी झेलमनदी उतरीत असतां तींत मजबरोबरच्या तोफांपैकीं १२ तोफा पडून बुडाल्या आहेत, जर त्या तुम्ही वर काढून 'पेशावर' येथें पोहोंचत्या कराल तर मी लाहोर शहर व त्या भोंवतालचा सर्व प्रदेश तुम्हांस देऊन 'राजा' हा किताब देईन.' रणजित्‌सिंगास प्रथमतः हें त्याचें म्हणणें खरें वाटलें व त्यावर भरंवसा ठेवून त्यानें नदींतून ८ तोफा बाहेर काढून त्या पेशावरास रवाना केल्या; परंतु त्यास पुढें असें कळलें कीं, झेमानशहा फार कपटी मनुष्य आहे; त्याच्या बोलण्यावर बिलकुल विश्वास ठेवितां उपयोगीं नाहीं. ह्याकरितां बाकी राहिलेल्या तोफा नदींतून बाहेर काढण्याच्या भरीस न पडतां त्यानें आपण हस्तगत केलेलें ठिकाण शत्रूच्या हातीं पुन्हां न जाण्याविषयींचा बंदोबस्त केला. याच वर्षीं 'नक्काईद' मिसलीचा मुख्य 'रामसिंग' याची कन्या 'राजकुवर'इज बरोबर त्यानें आपलें दुसरें लग्न लाविलें. असो.

वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें रणजित्‌सिंग झेमानशहाचें कृत्रीम ओळखून त्यास दाद न देतां इ. स. १७९९ त लाहोरच्या

किल्ल्यावर आपलें कायमचें निशाण फडकत ठेवून आपणास 'राजा' असें म्हणवूं लागला. वाचकहो, रणजित्सिंगाचें वरील कृत्य त्यावेळीं लहानसान कृत्यांपैकीं नव्हतें; कारण केवळ आपली अंगची कर्तबगारी, चपलता व मर्दुमकी इत्यादि अनेक गुणांच्या योगानें श्री शिवाजी महाराजांनीं अल्प वयांत म्हणजे आपल्या वयाच्या १९ व्या वर्षी विजापूरकरांच्या अमलांत असलेल्या महाराष्ट्रांतील तोरणा किल्यावर जसा आपला कीर्तिध्वज प्रथम उभारिला तद्वतच पंजाबप्रांतीं लाहोरच्या किल्ल्यावर आमच्या पंजाबी सिंहानें आपलें निशाण तो १९ वर्षांचा असतांच फडकाविलें ही आम्हीं आर्यांनीं मोठ्या अभिमानाची गोष्ट समजली पाहिजे. असो. रणजित्सिंगानें याप्रमाणें स्वदेशहिताचें काम आपल्या शिरावर घेण्यास आरंभ केला खरा; पण तें त्या वेळच्या त्या प्रांतांतील कित्येक शीख राजांस सहन झालें नाहीं. कारण रणजित्सिंगाचा बाप महान्सिंग याच्या कारकीर्दीपासून जी द्वेषबुद्धि किंवा मत्सर त्या लोकांत पसरला होता त्यास रणजित्सिंगाच्या वरील कृत्यामुळें अधिक बळकटी येत चालली. मुख्यत्वेंकरून भांगी मिसलीचे मुख्य सरदार, साहेबसिंग व गुलाबसिंग, यांनीं रणजित्सिंगापासून लाहोर शहर घेण्याचें मनांत आणून त्याकरितां त्यांनीं रामगढिया मिसलीचा मुख्य जो प्रसिद्ध 'जस्सासिंग' त्यास कांहीं आश्वासनें देऊन आपल्या कटांत सामील करून घेतलें, आणि रणजित्सिंगाविरूद्ध त्या त्रिवर्गांनीं एकसमयावच्छेदेंकरून एक नवीन बनाव घडवून आणिला. त्यांनीं आपसांत असें ठरविलें कीं, 'बसन' येथें दरबार भरवून त्या दरबारास येण्याविषयीं रणजित्सिंगास आमंत्रण पाठवावें, आणि तो तेथें आल्यावर

त्याजवर मारेकरी घालवून त्यास ठार करवावें. हा असा दुष्ट कट करण्याचें कारण एवढेंच होतें कीं, रणजित्सिंगास नाहींसा केल्याविना तें शहर त्यांच्या हस्तगत होण्याची त्यांस मुळींच आशा नव्हती. रणजित्सिंगास ह्या कटाची माहिती नव्हती, तरी पण त्यानें दरबारास जाण्याचें न नाकारितां सावधगिरीनें आपल्या बरोबर निवडक परंतु पूर्ण विश्वासू असे कांहीं थोडे हत्यारबंद लोक घेऊन व त्यांस दरबारचे जागेच्या नजीकच छपून राहाण्यास सांगून आपण स्वत: दोनचार सरदार बरोबर घेऊन दरबारांत आला; तेव्हां कटवाले दरबारी लोकांस त्याची त्यावेळची भव्यमुद्रा आणि बरोबर असलेल्या लोकांची हुशारी व चौकसपणा पाहून आपला इष्ट हेतु साध्य होण्यापूर्वीं आपल्यावर कोणकोणतीं विघ्नें ओढवतील याचा अंदाज होईना. नंतर त्यांनीं आपला दुष्ट हेतु सिद्धीस नेण्याऐवजीं वेळेवर नजर देऊन रणजित्सिंगाचें उत्तम प्रकारें आदरातिथ्य केलें, आणि दरबार भरविण्याची कांहीं तरी सबब सांगून तो लागलीच बरखास्तही केला.

ह्या दरबारचा अंतस्थ हेतु रणजित्सिंगास जरी कळला नव्हता तरी पण हें भांगी सरदारांचें कांहीं तरी कपट आहे असें खास जाणून त्यांच्याशीं पर्यायानें तरी खुसपट काढून त्यांस जिंकावें, ह्या उद्देशानें त्यानें इ. स. १८०२ च्या सुमारास त्या भांगी सरदारांकडे 'अमृतसर येथील किल्यावर एक प्रचंड व मजबूत अशी 'झमझमा' नांवाची तोफ होती, तिजबद्दल मागणें केलें. ह्या तोफेविषयीं एके ठिकाणीं असें लिहिलेलें आढळतें कीं, इ. स. १७६१ त अफगाण सरदार अहमदशहा अबदल्ली याणें ही तोफ 'पानिपत' येथील

घनघोर संग्रामाच्या वेळीं सदाशिवरावभाऊ पेशव्याच्या अफाट लष्करावर सोडण्याकरितां मुद्दाम लाहोर येथें तयार करविली होती. पुढें पेशव्यांच्या फौजेचा पराजय झाल्यावर त्यानें ती लाहोरच्या किल्यावर नेऊन ठेविली. नंतर इ. स. १७६४ त रणजित्‌सिंगाच्या आजानें लाहोर काबीज करून झमझमा आपल्या हस्तगत करून घेतली. तदनंतर भांगीशीख सरदारांचें वर्चस्व त्या प्रांतांत विशेष झाल्यामुळें त्यांनीं तेथून ती अमृतसरच्या किल्यावर आणून ठेविली. सांप्रत ही तोफ लाहोर येथील पदार्थसंग्रहालयांत आहे. असो. रणजित्‌सिंगाची ही मागणी जरी क्षुल्लक होती तरी ती जाणूनबुजूनच केली होती, म्हणून ती त्या सरदारांनीं अमान्य केली, यांत मोठेंसें नवल नाहीं. तेव्हां अर्थात् या अपमानाचा सूड म्हणून त्यानें अमृतसरावर एकदम चाल करून किल्यांत असलेले सदहू दोघे भांगीशीख सरदार व रामगढिया जस्सासिंग या तिघांस तेथून हांकून लावून तो किल्ला व त्याभोंवतालचा सर्व प्रदेश सर केला. ह्या जयामुळें रणजित्‌सिंगाची महत्वाकांक्षा अधिकच दुणावत चालली. त्यानें ह्यानंतर सर्व शीख राजे व सरदार असेच जिंकून सर्व पंजाबप्रांतवर आपली सत्ता चालविण्याचा निश्चय केला.

कन्हैय्या मिसलीसंबंधानें आम्ही पूर्वीं सांगितलेंच आहे; तसेंच या मिसलीचा व सुकरचकिया मिसलीचा रणजित्‌सिंगाच्या पहिल्या लग्नानें निकट संबंध जुळला गेला हेंही पण आमच्या वाचकांच्या ध्यानांत असेलच. तथापि आम्हांस एथें असें सांगितलें पाहिजे कीं, वरील संबंधाच्या योगानें जो परिणाम घडून आला तो त्या मिसलीच्या व सदाकुवरच्या नाशास कारणीभूत झाला असें यापुढील विवेचनावरून लक्षांत

येईल. कारण, कन्हैय्या जयसिंग मृत्यु पावल्यानंतर त्या मिसलीचीं सर्व सूत्रें सदाकुवरनें आपल्या हातीं घेतलीं होतीं. सदाकुवरच्या स्वभावाविषयीं आम्ही यापूर्वी सांगितलें असल्याकारणानें आतां त्याची द्विरुक्ति करण्याचें कारण नाहीं. तिला जें काय करावयाचें असे तें सर्व ती आपल्या स्वभावास अनुसरूनच करीत असे. रणजित्‌सिंगास मात्र आपलें हिताहित कळूं लागल्यापासून तो तिचा आपल्या मनांत द्वेष करूं लागला होता व प्रसंगविशेषीं तिला नाहींशी करण्याची संधी पहात होता. असो. रणजित्‌सिंगानें या मिसलींतील बडेबडे लोक आपल्यास अनुकूल करून घेतले असल्याकारणानें सदाकुवरला एक प्रकारची चांगली दहशत बसली होती; कारण आपला जांवई आपल्या कह्यांत आतां राहात नाहीं, इतकेंच नाहीं; तर तो कन्हैय्या मिसलीचा नाश करून त्यावर आपलें कायमचें वर्चस्व खाचित स्थापित करणार, अशी तिची पक्की खात्री झाल्यावरून तिनें पुढें कित्येक दिवसपर्यंत कांहीं गडबड वगैरे केली नाहीं. नंतर लाहोर येथून दोन चार मैलांच्या अंतरांवर असलेलें 'शहादेरा' नांवाचें एक ठाणें होतें त्या ठिकाणीं ती जाऊन राहिली. परंतु तेथूनही ती कांहीं दिवसांनीं बटाला येथें परत आली व तेथून इंग्लिशांशीं दळणवळण बांधून त्यांच्या आश्रयाखालीं सिस-सतलज प्रांतांत येऊन रहाण्याचा तिनें शेवटचा विचार केला. हें वर्तमान रणजित्‌सिंगास कळतांच त्यानें तीस बोलावणें पाठविलें; परंतु तिनें त्या बोलावण्यास न जुमानितां बटाला येथून गुप्तपणें निघून जाण्याची तयारी केली. ह्यामुळें शेवटीं असें झालें कीं, रणजित्‌सिंग फार रागास जाऊन त्यानें लागलेच आपले कांहीं

स्वार पाठवून त्यांजकडून वाटेंत तिला तिच्या मेण्यासह पकडून लाहोर येथें आणविलें; परंतु ती तेथें आल्यावर कांहीं दिवसांनीं तिचा तेथेंच अंत झाला.

ह्याप्रमाणें सदाकुवरच्या मृत्यूनें रणजित्सिंगाचा इष्ट हेतु पूर्ण झाला; तथापि कन्हैय्या मिसलीचा सर्व कारभार त्याच्या हातीं येण्यास त्यास बराच त्रास सोसावा लागला. रणजित्सिंगास वर सांगितलेल्या १२ मिसलींपैकीं आतां कोणीही शत्रू उरला नाहीं असें म्हटल्यास फारसा बाध येईल असें नाहीं. कारण त्या त्या मिसलींतील बहुतेक शीखराजे व सरदार, रणजित्सिंगाचा उत्तरोत्तर दिग्विजय होत चालला आहे असें पाहून त्याजबरोबर मित्रत्वाच्या नात्यानें वागूं लागले. तथापि त्या प्रांतांत दरीखोऱ्यांत राहणाऱ्या कांहीं अडाणी व रानटी मुसलमान लोकांच्या टोळ्या होत्या त्यांजपासून मात्र त्यास वारंवार उपद्रव होत असे, परंतु हळूहळू त्यांचाही त्या हिम्मतबहाद्दरानें यथावकाशानें पुरता नाश करून टाकिला.

## भाग १.

सिस्–सतलजप्रांतासंबंधानें रणजित्सिंगाचा विचार–यशवंतराव होळकर–त्यास पतियाळच्या राजाचा आश्रय–तेथून त्याचें जाणें–रणजित्सिंग, भवानसिंग, आणि भागसिंग यांचें त्यास साहाय्य करण्याविषयीं झालेलें संगनमत–रणजित्सिंगाचा व कंपनीसरकारचा तह–पतियाळचा राजा व भागसिंग या उभयतांत तंटा–तो मिटवण्यास रणजित्सिंगाचें जाणें–कर्नोळा येथें कंपनीसरकार लष्कर पाठवितें–सी. टी. मेटकाफ्–त्याची व रणजित्सिंगाची मुलाकत–फ्रेंचसरकार व कंपनीसरकार यांमध्यें लढाई होण्याचीं चिन्हें–कंपनीसरकारचा व रणजित्सिंगाचा तह इ०

मागील प्रकरणांत आमच्या चरित्रनायकाचे तीर्थरूप महान्सिंग निवर्तल्यापासून तों त्यानें आपल्या पराक्रमानें स्वतःस स्वातंत्र्य मिळवून घेईपर्यंत आम्ही वाचकांस बहुतेक माहिती करून दिली आहे. आतां यापुढील भागासंबंधानें म्हणजे पूर्वी सांगितल्याप्रमाणें दरीखोऱ्यांत राहणारे रानटी मुसलमान लोक व त्याचप्रमाणें पंजाबप्रांताच्या उत्तरेकडील डोंगराळ प्रदेशांत राहणारे युसफजाई वगैरे अडदांड लोक आणि इंग्रजलोक या सर्वांशीं रणजित्सिंगाची वागणूक कशी होती वगैरे संबंधानें आम्ही लिहिण्याचें योजिलें आहे. प्रथमतः त्यावेळीं म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीं हिंदुस्तानांत गाजत असलेल्या ईस्ट इंडिया कंपनीचा अथवा कंपनीसरकारचा आणि प्रस्तुत चरित्रनायकाचा जो संबंध जुळला, तत्संबंधाची हकीकत आम्ही येथें सादर करितों.

इ. स. १८०३ सालीं इंग्लिशांनीं मराठ्यांच्या सैन्याचा 'दिल्ली' व 'लासवारी' ह्या दोन ठिकाणीं पराभव करून आपलें निशाण 'सिस्–सतलज टेरीटरी' (सतलज नदीच्या कांठचा प्रदेश ) वर आणून रोंविलें. नंतर दुसऱ्या वर्षीं म्हणजे इ. स. १८०४ त यशवंराव होळकरानें इंग्रज सेनापती कर्नल 'मानसन्' याचा पराभव करून त्यास दिल्ली येथें वेढा दिल्याचें समजल्यावरून कर्नल 'ऑक्टर लोनी' व 'वर्न' ह्या दोघां इंग्रज सरदारांनीं होळकरावर चाल करून मोठ्या हिम्मतीनें तो वेढा उठविला. हें कृत्य झाल्यानंतर यशवंतरावानें कांहीं दिवसपर्यंत फारशी हालचाल न करितां पंजाब प्रांतांतील सतलजनदीच्या दाक्षिणेकडील प्रदेशांत नवीन लष्कर जमविण्याची खटपट सुरू केली. तो प्रथम पतियाळच्या राजाकडे कांहीं दिवस येऊन राहिला; परंतु त्या राजानें असें पाहिलें कीं, आपण होळकरास आश्रय दिल्याचें कंपनी-सरकारास समजलें तर तें त्या सरकारास मान्य होणार नाहीं; कारण आपला व त्या सरकारचा जो पूर्वींपासून सलोखा आहे त्यांत व्यत्यय येऊन तें जबरदस्त सरकार आपल्या राज्यावर कदाचित् चालून येऊन आपला सूड उगवून घेईल. या भीतीमुळें त्यानें यशवंतराव होळकरास तेथून निघून जाण्यास सांगितलें. सदरहू प्रमाणेंच त्या प्रांतांतील दुसऱ्या शीख संस्थानिकांनींही त्यास मदत दिली नाहीं. यामुळें यशवंतराव होळकरास हताश होऊन अमृतसराकडे यावें लागलें. तेथें आल्यावर त्याची आणि आमचा चरित्रनायक रणजित्सिंग, फत्तेसिंग अहलुवालिया व झिंदचा राजा भागसिंग या त्रयींची गांठ पडली. परंतु हें वर्तमान इंग्रज सरदार जनरल 'लेक' यास समजतांच तो होळकराचा पाठलाग करण्याकरितां इ. स. १८०५ च्या

ऑक्टोबर महिन्यांत आपल्या फौजेनिशीं अमृतसराकडे येऊन दाखल झाला. इतक्यांत त्यास कलकत्त्याच्या गव्हर्नर जनरलाकडून रणजित्सिंगाबरोबर मैत्रीचा तह करण्याबाबद लिहून आल्यावरून त्यानें इ. स. १८०६ च्या जानेवारी महिन्याच्या पहिल्या तारखेस रणजित्सिंगाबरोबर तह केला. ह्या तहाचीं कलमें अशीं होतीं:–( १ ) यशवंतराव होळकर यास आश्रय न देतां त्यास अमृतसर येथून जाण्यास सांगावें. ( २ ) होळकरास कोणत्याही प्रकारें सदरील शीख सरदारांनीं साहाय्य करूं नये. ह्याप्रमाणें हा दुकलमी तहनामा झाल्यावर लागलीच कंपनीसरकारानें त्याचा मोबदला म्हणून असें ठरविलें कीं, ' सदरील तीन असामींनीं हीं वरील कलमें पूर्णपणें पाळिल्यास कंपनीसरकार त्यांच्या मुलखांवर आपलें लष्कर न पाठवितां शत्रूपासून त्यांचें चांगलें संरक्षण करील " ह्यावरून रणजित्सिंग व कंपनीसरकार यांचा स्नेहसंबंध कसा जुळला हें आमच्या वाचकांच्या सहज लक्षांत येण्याजोगें आहे.

रणजित्सिंगानें सतलजनदीच्या उत्तरेकडील प्रांतावर आपलें वर्चस्व पूर्वीच बसविलें होतें हें आम्ही मागें सांगितलें आहे; तथापि त्या प्रांताची व्यवस्था बरोबर लागली नसल्यामुळें त्यांत वारंवार तंटे बखेडे उद्भवत असत. प्रत्यक्ष रणजित्सिंगाचा मामा म्हणजे झिंदचा राजा भागसिंग आणि पतियाळचा राजा साहेबसिंग ह्या दोघांमध्यें तंटा उपस्थित झाला होता; म्हणून झिंदच्या राजाच्या बोलावण्यावरून रणजित्सिंगास तो तंटा मिटविण्याकरितां सतलज नदी उतरून दक्षिणेकडे जाणें भाग पडलें. तो तारीख २६ माहे जुलै इ. स. १८०६ रोजीं सतलज उतरून गेला; परंतु हें वर्तमान

कंपनीसरकारास कळतांच त्या सरकारानें ' कर्नोला ' येथें आपली फौज आणून ठेविली. त्या सरकारास असें वाटलें कीं, न जाणों, आपण दोस्त या नात्यानें ज्याचें संरक्षण करीत आहों त्या पतियाळच्या राजावर कांहीं घोरपड आल्यास रणजित्‌सिंगाबरोबर आपणास झगडावें लागेल, ' कर्नोला ' हें ठाणें ' पानिपत ' येथून सुमारें १८ कोसांवर आहे. त्या ठिकाणीं, वास्तविक पाहतां, कंपनीसरकारास फौज आणून ठेवण्याची कांहीं जरूरी नव्हती; कारण रणजित्‌सिंगाची त्या सरकारास जी भीति वाटत होती ती अगदीं निरर्थक होती. असो. रणजित्‌सिंगानें वरील तंटा अगदीं बिनबोभाट व सलोख्यानें मिटवून तेथून लवकरच तो लाहोरास आला. परंतु त्यानें परत येतेवेळीं इतकें मात्र केलें कीं, वाटेंत ' लुधियाना ' व ' घुमग्रण ' हीं दोन शहरें आपल्या हस्तगत करून घेतलीं. वाचकहो, आपण आतां अंमळ येथें थांबून युरोपांत कंपनीसरकारावर येऊं पाहणाऱ्या अरिष्टाकडे वळूं. कारण आमचा चरित्रनायक आणि कंपनीसरकारचा दोस्त ह्याचा वरील कारणामुळें त्या सरकाराशीं आणखी अधिक संबंध येऊं पहात आहे. तो प्रकार असा.

यूरोपांत फ्रेंचसरकार व कंपनीसरकार या दोहोंमध्यें जो पूर्वापार मत्सर उत्पन्न झाला होता त्यास कालमानाप्रमाणें नूतनांकुर फुटत चालल्यामुळें हिंदुस्तानांतील इंग्रज लोकांस फ्रेंचांची पुन्हा भीति वाटूं लागली होती; म्हणून त्यांच्या बंदोबस्ताची इकडे चांगली तयारी करावी या हेतूनें कंपनीसरकारानें आपल्या दोस्तांकडे विनंतीपत्रें व वकील पाठवून त्यांजकडून प्रसंगीं चांगली मदत होईल अशी तजवीज चालविली. त्याप्रमाणें इ. स. १८०८ च्या आगष्ट महिन्यांत कलकत्त्याच्या गव्हरनर जनरलानें

कोणी सी. टी. मेटकाफ् नामक कर्नोला येथें असलेल्या आपल्या वकीलास रणजित्सिंगाकडे पाठविलें. त्या मेटकाफ् साहेबाची व रणजित्सिंगाची भेट ' कासूर ' येथें तारिख ११ सप्टंबर रोजीं झाली. त्यासमयीं त्या साहेबानें कंपनीसरकारातर्फे रणजित्सिंगास जें सांगितलें त्यांतील सारांश येणेंप्रमाणें होता:–" फ्रेंच सरकारानें हिंदुस्तानांतील कंपनीसरकारच्या मुलुखावर स्वारी केली असतां लाहोर दरबारानें कंपनीसरकाराबरोबर जें नुकतेंच मित्रत्वाचें नातें संपादिलें आहे, तें कायम राखून फ्रेंच लोकांस हांकून लाविण्याच्या कामीं पूर्ण मदत केली पाहिजे." त्यावर रणजित्सिंगानें मेटकाफ् साहेबास असें उत्तर दिलें कीं " मी कंपनीसरकारच्या विचारा बाहेर नाहीं. फक्त माझी एवढीच विनंती आहे कीं, कंपनीसरकारानें सतलज नदीच्या दक्षिणेकडील प्रांतांतील सर्व शीख संस्थानांवरील माझें वर्चस्व कायम राखावें. " मेटकाफ् साहेबास रणजित्सिंगाचें हें म्हणणें मान्य करण्यास त्यावेळीं मोठी पंचाईत पडली; परंतु आपण हा सर्व मजकूर गव्हरनर जनरलाच्या कानांवर घालून मग काय तो जबाब देऊं असें सांगून तो साहेब तेथून 'अंबाला' येथें निघून गेला. नंतर रणजित्सिंगानें सतलज नदीवरील फरीदकोट, मालरकोटला, आणि खाय ह्याठिकाणीं जाऊन तेथें असलेल्या शीख अधिकाऱ्यांकडून खंडणी घेतली. वास्तविक पहातां हीं ठिकाणें कंपनीसरकारच्या आश्रयाखालीं होतीं व त्याबद्दल कंपनीसरकारास अभिमानही वाटत होता; परंतु मेटकाफ् साहेबानें प्रसंगास अनुसरून तिकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. तथापि रणजित्सिंगाकडून हा जो कंपनीसरकारचा उपमर्द

झाला त्याचा मोबदला तें सरकार घेतल्यावांचून राहणार नाहीं हें तो साहेब पक्कें समजून होता.

हें वरील वर्तमान घडल्यानंतर रणजित्सिंगानें असा विचार केला कीं, जरी फ्रेंचलोकांची आणि कंपनीसरकारची हिंदुस्तानांत लढाई जुंपली तरी आपल्यास तत्संबंधानें भीति बाळगिण्याचें कारण दिसत नाहीं. फ्रेंचलोक आपले शत्रू नाहींत, ते इंग्रजलोकांचे शत्रू आहेत आणि यद्यपि त्यांचा व कंपनीसरकारचा सामना झालाच तर इंग्रजलोक आपल्यास मदतीकरितां बोलावितील हें निश्चित आहे; व तसें झालें म्हणजे मग आपला वरील मतलब सिद्धीस जाण्यास फारसा अडथळा येणार नाहीं. असा विचार करून त्यानें 'शहाबाद' घेऊन तो अमृतसर येथें निघून गेला. तेथें आल्यावर त्याची व मेटकाफ् साहेबाची तारीख १० दिजंबर रोजीं पुन्हां भेट झाली. परंतु ह्या भेटीच्या वेळीं रणजित्सिंगास वकीलाचा अंतर्भाव कांहींसा निराळा भासला. वकील मेटकाफ् साहेबानें रणजित्सिंगाच्या पहिल्या भेटींत घडलेल्या मजकुराची हकीकत कलकत्त्यास कळविली होती. तिचा गव्हरनर जनरलानें विचार करून सदरहू वकीलामार्फत रणजित्सिंगास असें स्पष्ट कळविलें कीं "आम्हांस फ्रेंच सरकारची हा वेळ पर्यंत जी भीति वाटत होती ती बहुतेक कमी झाल्यामुळें हिंदुस्तानांतील रजवाड्यांपैकीं कोणाच्याही मदतीची आतां जरूर नाहीं असें रणजित्सिंगास सांगावें; आणखी त्यास असेंही कळवावें कीं, मराठ्यांच्या व आमच्या सरहद्दीसंबंधानें ज्या वारंवार कटकटी होत असतात ती सरहद्द सतलज नदी असून तिच्या कांठच्या दक्षिणेकडील भागावर आमचा पूर्ण अंमल बसला असल्याकारणानें त्या भागांत जे शीख

राजे व सरदार असतील त्यांजवर जें तुम्ही आपलें वर्चस्व सांगत आहां तें कंपनीसरकारास बिलकूल मान्य नाहीं."

ह्या वरील खलित्याचा मथितार्थ रणजितसिंगानें जाणून आपलें लष्कर व युद्धोपयोगी सर्व सामान अमृतसर येथें त्यानें नवीन बांधिलेल्या 'गोविंदगड' नामक किल्यांत नेऊन ठेविलें कारण त्यास असें वाटलें कीं, कंपनीसरकारचा व आपला जरी स्नेहवर्धक तह झाला आहे तरी, तो यापुढें कायम राहून त्याचा परिणाम चांगल्या प्रकारें घडून येईल अशी आशा बाळगणें व्यर्थ आहे; म्हणून त्यानें वर सांगितल्याप्रमाणें बंदोबस्त करून आपला विश्वासू व हुशार सेनापति 'सरदार मोकमचंद' ज्यास 'कांगरा दरी' घेण्याकरितां रवाना केलें होतें, त्यास बोलावून आणून त्यासह त्यानें लुधियाना शहरानजीक सतलज नदीच्या कांठच्या 'फिलोर' गांवाकडे कूच केलें. हा फिलोर गांव कंपनीसरकाराकडे होता, म्हणून गव्हरनर जनरलास कळतांच त्यानें इंग्रज सेनापति कर्नल ऑक्टर लोनी त्यास फौजेसह लुधियानाकडे जाण्याचा हुकूम दिला. त्यासमयीं उभयपक्षाची लढाईची तयारी झाली; परंतु रणजितसिंगास कंपनीसरकाराशीं लढत बसणें हें तत्कालीन अगदीं नाजूक स्थितीस उचित नव्हतें. याचें कारण हें आहे कीं, त्यावेळीं त्याचे शत्रू जे दुसरे शीख राजे, ते त्याच्या विरुद्ध गुप्त कटाची योजना करीत होते; म्हणून कंपनीसरकारशीं लढण्यापेक्षां असल्या गुप्त कटवाल्यांचा समूळ नाश करावा हा उत्तम पक्ष, असें समजून रणजितसिंगानें तारीख २९ माहे एप्रील इ. स. १८०९ रोजीं एक तहनामा तयार केला आणि त्यावर आपली सही करून तो मंजुरीकरितां कलकत्यास गव्हरनर जनरलाकडे रवाना केला. त्यांत त्यानें

असें नमूद केलें होतें:—“कंपनीसरकारानें सतलज नदीच्या उत्तरेकडील प्रदेशांत व त्यांतील राहिवाशांच्या हितसंबंधांत बिलकुल हात घालूं नये, व त्याप्रमाणेंच त्या नदीच्या दक्षिणेकडील प्रांतावर व त्यांतील रजवाड्यांवर आम्ही आपलें वर्चस्व न सांगतां त्यांजकडून खंडणीच्या रूपानें अथवा दुसऱ्या कोणत्याही प्रकारानें वसूल किंवा कर घेणार नाहीं.” हा तहनामा गव्हरनर जनरलानें पाहून पसंत केला आणि त्यावर तारीख ३० माहे मे रोजीं आपली सही केली. असो. ह्याप्रमाणें रणजित्सिंगानें कंपनीसरकारची समजूत करून व सिस्सतलज प्रांतांत ढवळाढवळ करण्याचें सोडून देऊन आपण त्या सरकारचा कायमचा दोस्त होऊन राहिला. नंतर त्यानें आपलें लक्ष अनुक्रमें मुलतान, काश्मीर व पेशावर वगैरे प्रांत घेण्याकडे लावून तो आपला फौजफांटा जय्यत ठेवण्याच्या तयारीस लागला.

## भाग ४.

रणजित्सिंगाचें मुलतान, काश्मीर, व पेशावर
घेणें—तत्संबंधानें लढाया वगैरे—बरक झाई,
युसुफ झाई, काबूली पठाण वगैरे
लोकांस जिंकणें—इ०

इराण देशाचा बादशाहा प्रसिद्ध नादीरशहा ह्यानें इ. स. १७३८ त हिंदुस्तानच्या उत्तरेकडील प्रांतावर स्वारी करून दिल्ली पर्यंत येऊन तें शहर काबीज केलें हें सर्वांस माहीत आहेच. त्यावेळीं ' मुलतान ' भोंवतालचा प्रदेश एका अफगाण नबाबाच्या ताब्यांत होता. तदनंतर इ. स. १७७१ पासून इ. स. १७७९ च्या दरम्यान तो सर्व प्रदेश भांगी शीख राजांच्या ताब्यांत आला. परंतु ह्या शेवटच्या वर्षी म्हणजे इ. स. १७७९ त दिल्लीचा बादशहा तैमूर किंवा तिमूर ह्यानें मुलतान येथील शीख भांग्यास हांकून लावून 'मुझफरखान' नामक आपल्या एका सरदारास त्या प्रांताचा सुभेदार नेमिलें. ह्या मुझफरखानास अल्पवयी रणजित्सिंगाच्या शौर्याबद्दलची हकीकत ह्यापूर्वी कळली होती व तो मुलतान घेण्याकरितां आपल्यावर स्वारी केल्यावांचून राहणार नाहीं हेंही तो पूर्णपणें समजून होता; म्हणून त्यानें असें केलें कीं, रणजित्सिंग जेव्हां त्या प्रदेशाची माहिती करून घेण्याकरितां मुलतानच्या उत्तरेस २० मैलांवर 'महातम' नांवाच्या ठाण्यास येऊन दाखल झाला, तेव्हां त्याची मुलाकत घेऊन त्यास नजराण्यादाखल ७० हजार रुपये देऊन माघारें परतविलें. परंतु इतक्यानें लोभी रणजित्सिंगाची तृप्ति न होतां

त्याला मुलतानवर स्वारी करून तें काबीज करून घेण्याची अधिकच इच्छा उत्पन्न झाली.

वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें मुझफरखानापासून नजराणा घेऊन रणजित्सिंग लाहोर येथें आल्यावर त्यानें आपल्या सैन्याची जय्यत तयारी चालविली; कारण त्यावेळीं मुझफर-खानाच्या तैनातींत जे कांहीं शूर शीख सरदार होते त्यांनीं त्या किल्ल्याचा फार उत्तम प्रकारचा बंदोबस्त करून ठेविला होता. रणजित्सिंगानें इ. स. १८१० च्या फेब्रुवारी महि-न्याच्या २४ व्या तारखेस लाहोर येथून आपल्या फौजेनिशीं येऊन मुलतान नजीक तळ दिला, आणि दुसऱ्याच दिवशीं तें शहर हस्तगत करून घेतलें; पण तेथील किल्ला मात्र त्याच्या हस्तगत झाला नाहीं. कारण त्या किल्ल्याच्या संरक्ष-णार्थ पूर्वी सांगितल्याप्रमाणें शूर शीखलोकांचा बराच भरणा असल्यामुळें रणजित्सिंगाच्या लष्करास किल्ल्यांत घुसण्यास फारच अडचण आली. शीख लोक जरी त्या वेळीं मुसलमान सरदाराच्या तैनातींत होते तरी ते इमानी, व धनी म्हटला म्हणजे त्यास आपल्या प्राणापेक्षांही अधिक मानणारे, हें आमच्या वाचकांस इ. स. १८५७ सालच्या शिपाई लोकांच्या धामधुमीच्या इतिहासावरून कळून येईल. असो. मुल-तानच्या किल्ल्यास रणजित्सिंगाच्या लोकांनीं वेढा दिला होता, तथापि आंतील लोकांनीं बरेच दिवसपर्यंत त्यांस मुळींच दाद दिली नाहीं. शेवटीं निरुपायास्तव किल्ल्यांतील लोकांनीं आंतून सुरुंग लावून भोंवतालची तटबंदी उडवून देऊन रणजित्सिं-गाच्या तोफखान्यावरील मुख्य सरदार 'अतारसिंग धारी' व आणखी १२ लोक यमसदनास पाठवून दिल्यामुळें बाहेरील लोकांनीं वेढा उठवून पिच्छेहाट केली. नंतर मार्च

महिन्याच्या २१ व्या तारखेस पुन्हा एकवार उचल खाऊन रणजित्‌सिंगानें किल्ल्यावर हल्ला केला; परंतु त्यांतही त्यास यश आलें नाहीं. शेवटीं आणखी चार दिवसांनीं म्हणजे तारीख २९ रोजीं रणजित्‌सिंगाच्या लोकांनीं मोठा हिय्या करून आपल्या दैवाची परीक्षा पहाण्याचा विचार मनांत आणिला; परंतु पूर्ववत्‌ ह्याही खेपेस त्यांस मागें हटावें लागलें. ह्यावेळीं रणजित्‌सिंगानें आपला हुशार सेनापती दिवाण मोकमचंद एकाएकीं फारच आजारी पडला, व दुसरे कित्येक सरदार मृत्युमुखीं पडले असें पाहून मुझफर-खानाबरोबर तहाचें बोलणें लाविलें. हें तहाचें बोलणें त्या खानासही पसंत पडलें; कारण ह्या वेढ्यांत त्याचाही अतिशय नाश झाला होता. ह्या तहामुळें रणजित्‌सिंगास खानापासून अडीच लाख रुपये, वीस लढाऊ घोडे आणि लढाईचा खर्च हीं मिळालीं. त्यापैकीं ३० हजार रुपये तर त्यानें त्याचवेळीं रोख घेऊन तो एप्रिल महिन्याच्या १४ व्या तारखेस मुलतान सोडून लाहोराकडे निघून गेला.

मुलतानचा किल्ला आपल्या हातीं लागत नाहीं असें पाहून रणजित्‌सिंगानें तो घेण्याचें काम कांहीं दिवस पर्यंत लांबणीवर टाकून काश्मीर प्रांत घेण्याचा विचार केला, व त्याप्रमाणें त्यानें त्या प्रांताकडे इ. स. १८११ त आपला मोर्चा फिरविला. काश्मीर व त्या भोंवतालचा प्रदेश ' हिमालय पर्वतांत असल्यामुळें त्या प्रदेशाचा बंदोबस्त ईश्वर-निर्मित झालेला आहे हें येथें नव्यानें सांगण्याची जरूरी नाहीं. अशा बिकट प्रदेशावर स्वारी करणें मोठ्या खर्चाचें व प्रयासाचें काम आहे हें स्पष्ट दिसत होतें. असें असतां रणजित्‌सिंगानें त्या प्रदेशावर स्वारी करण्याचें योजिलें हें

त्यावेळच्या एकंदर स्थितीवरून पाहिलें असतां त्यानें खरो-
खर मोठेंच धाडस केलें असें कोण म्हणणार नाहीं ? असो.
ह्या स्वारींत रणजितसिंगानें प्रथमतः असें केलें कीं, ही
मोहीम चालू करण्यापूर्वीं ' भिंबर ' व ' राजिवरी '
हीं दोन डोंगरी संस्थानें अनुक्रमें कुलुजातीच्या रजपूत आणि
मुसलमान राजांपासून इ. स. १८१२ त घेऊन आपल्या
फौजेस जाण्यायेण्याचा मार्ग खुला करून दिला. नंतर त्यानें
काबूलच्या राजाचा मुख्य वजीर 'फत्तेखान' हा सिंधुनद
उतरून काश्मीरप्रांत घेण्याच्या उद्देशानें येत असतां त्याची
भेट घेऊन आणि त्याजबरोबर कांहीं सवलतीच्या गोष्टी
बोलून त्याची मैत्री संपादिली. परंतु ह्या मैत्रींत फारसा अर्थ
नव्हता; कारण ते पूर्वींपासून एकमेकांचे प्रतिस्पर्धी होते.
इतकी व्यवस्था झाल्यावर रणजितसिंगानें आपला सरदार
मोकमचंद यास काश्मीरावर पाठविण्याचा विचार कायम
करून फत्तेखान वजीर त्या प्रांतांत शिरण्यापूर्वींच त्यास
लाहोर येथून रवाना केलें. मोकमचंदास काश्मीरच्या रस्त्याची
माहिती नसल्यामुळें पदभ्रष्ट राजिवरी संस्थानच्या नबाबास २९
हजार रुपयांची लालूच दाखवून त्यास त्यानें आपल्या बरोबर
घेतलें. तदनंतर ते आपल्या सैन्यासह दरकूच दरमजल करीत
मार्गांत फत्तेखान वजीर 'शेरगड' व 'हरीपर्वत' ह्या नांवाचे
दोन किल्ले होते ते घेत असतां त्यास येऊन मिळाले. तेव्हां ह्या
दोन्ही किल्ल्यांतील लूट फत्तेखानाच्या व मोकमचंदाच्या
लोकांनीं केली, परंतु त्यावेळीं फत्तेखानानें मोकमचंदास स्प-
ष्टपणें असें सांगितलें कीं, ह्या लुटीचा भाग शीख सैन्यास
मिळणार नाहीं. हें वर्त्तमान मोकमचंदानें लाहोर येथें रणजित-
सिंगास कळवून आपली फौज काश्मीरच्या रस्त्यानें चालविली.

रणजित्सिंगानें फत्तेखानाचें कपट पूर्वीच जाणिलें होतें व त्याचा प्रत्ययही त्यास लौकरच आला; म्हणून त्यानें काश्मीरच्या पूर्वीच्या सुभेदाराचा भाऊ 'जहान्दादखान' जो सिंधुनदाच्या कांठीं 'अटक' येथें होता, त्यास अनुकूल करून घेऊन तेथील किल्ला आपल्या ताब्यांत घेतला. हा त्यावेळीं फत्तेखानाच्या वर्चस्वाखालीं असून त्याजवर जहान्दादखानाची नेमणूक झालेली होती; म्हणून फत्तेखानास हें वर्तमान कळतांच तो काश्मीर घेण्याचें सोडून देऊन अटक येथें इ. स. १८१३ च्या एप्रील महिन्यांत दाखल झाला. तेव्हां सरदार मोकमचंदासही त्याच्या मागोमाग अटक येथें येणें भाग पडलें. मोकमचंदाच्या लष्कराचा तळ अटकेनजीक 'हैदारू' येथें पडला होता. नंतर जुलै महिन्याच्या १३ व्या तारखेस लढाईस तोंड लागलें. 'दोस्त महमदखान' जो पुढें काबूलचा राजा म्हणून प्रसिद्धीस आला, तोही ह्या लढाईंत फत्तेखान वजिरास फौजेनिशीं येऊन मिळाला. ह्या सर्व काबुली लष्करानें मोकमचंदाच्या हाताखालच्या सैन्याची फळी फोडून त्याची फार दाणादाण करून टाकिली. तेव्हां अफगाण लोकांस आपला जय झाला असें वाटून ते लुटालूट करूं लागले; परंतु लागलीच मोकमचंदानें आपले खास ठेविलेले लोक बरोबर घेऊन व शत्रु बेसावधपणें लुटालूट करीत आहे असें पाहून त्याजवर मोठ्या शिताफीनें हल्ला केला. तो हल्ला त्या अफगाण लोकांस इतका असह्य झाला कीं, त्यांस पळतां भुई थोडी झाली. फत्तेखान वजीर तर ह्या हल्ल्यांत कोणीकडे पळून गेला त्याचा मोकमचंदास पत्तासुद्धां लागला नाहीं. असो. वाचकहो, रणजित्सिंगाच्या कारकीर्दींत अफगाण लोकांची व शीख लोकांची जी पहिली लढाई झाली ती हीच होय.

तदनंतर दुसऱ्यावर्षीं म्हणजे इ. स. १८१५ त रणजित्‌सिंगास असें वाटलें कीं, ह्यापुढें फत्तेखान काश्मीर घेण्याच्या वखेड्यांत पडणार नाहीं, म्हणून आपण एकट्यानेंच आतां त्या प्रांतावर स्वारीकरून तो जिंकून घ्यावा. परंतु या मसलतीस त्याचा सरदार व सेनापती मोकमचंद अनुमोदन देईना. कारण तो ह्यावेळींसुद्धां आजारी पडला होता व आतां स्वारीचें काम आपल्या हातून पार पडेल अशी त्यास खात्रीही नव्हती; शिवाय त्यावेळीं दुसरे डोंगरी संस्थानिकही रणजित्‌सिंगाविरुद्ध झाले होते. परंतु ह्या दोन्ही गोष्टींकडे रणजित्‌सिंगानें लक्ष न देतां आपल्या सैन्याचे दोन भाग करून एका भागाचें अधिपत्य मोकमचंदाचा नातू 'रामदयाळ' याजकडे देऊन दुसऱ्या भागाचें अधिपत्य 'भय्या रामसिंग' याजकडे दिलें. हा रामदयाळ आपल्या आजाप्रमाणेंच शूर असून लढाईच्या कामांत चांगला वाकबगार होता. त्यानें ह्या मोहिमेचें काम आपल्या शिरावर घेऊन तो आपल्या सैन्यासह 'सियाल्लकोट' येथें येऊन दाखल झाला; पण पुढील मार्ग फार अडचणीचा आहे असें पाहून त्यास आपण मोठ्या संकटांत येऊन पडलों असें वाटूं लागलें. नंतर राजिवरी संस्थानचा राजा 'अगरखान' यानें त्यास असें सुचविलें कीं, येथून आतां आपलें लष्कर कांहीं *'पंच' मार्गानें व कांहीं †'ब्रह्मगाला' या मार्गानें काश्मीर प्रदेशांत न्यावें, तेव्हां ह्या वरील सूचनेप्रमाणें रामदयाळानें आपलें लष्कर सदरहू दोन्ही रस्त्यांनीं चालू केलें. नंतर

*–† पंच व ब्रह्मगाला हे दोन डोंगर फार उंच असून काश्मीरच्या पायथ्याशीं आहेत. ह्या डोंगरांतून काश्मीरापर्यंत जाणारे जे पायमार्ग आहेत ते फार बिकट असून कधीं कधीं बर्फाच्छादित असतात.

रामदयाळ ज्या तुकडीबरोबर होता ती तुकडी *" पीरपंजल " घांट उतरून पलीकडे गेली नाहीं तोंच अकस्मात् काश्मीरच्या सुभेदाराच्या लोकांनीं त्या तुकडीवर हल्ला केला. त्या वेळीं रामदयाळ आणि त्याचे लोक वाटेचे श्रम व त्रास ह्यामुळें अगदीं थकून गेले होते. तथापि त्या शीख लष्करानें आपल्या ब्रीदास जागून हल्ला करणाऱ्या लोकांबरोबर निकरानें लढून बराच वेळ पावेतों टिकाव धरिला. इतक्यांत दुसरी टोळी रामदयाळास येऊन मिळाल्यामुळें त्यास कांहीं धीर येऊन त्यानें पुढील मार्ग स्वीकारिला. तरी अफगाण लोक त्यास मधून मधून आडवे येतच असत. रामदयाळास हा वेळ पावेतों भय्या रामसिंग याची कांहींच मदत झाली नाहीं. कारण तो त्याजपासून मागें बराच दूर राहिला होता. ह्या वरील अफगाण लोकांच्या हल्ल्यांत रामदयाळाचें बरेंच नुकसान होऊन लोकही फार मारले गेले. त्याचे चांगले चांगले शिपाई बरेच मेल्यामुळें त्याचें धैर्य थोडेंसें खचल्या सारखें झालें होतें; तथापि भय्यारामसिंगाचे लोक येऊन मिळाल्यावर त्या हिम्मतबाहद्दरानें आणखी एकदां काश्मीरी सैन्यास गांठून त्यास पुरा हात दाखविण्याचा निश्चय केला. परंतु अफगाण सुभेदार ' अझीमखान ' ह्यानें त्याचें कांहीं चालूं दिलें नाहीं. नंतर रामदयाळानें पंजाबाकडे परत येण्याचें ठरवून आपलें सर्व सैन्य लवकरच माघारें आणिलें.

रामदयाळ ह्याप्रमाणें पंजाबकडे परत आला हें पाहून रणजितसिंगास वाईट वाटलें; तरी त्याची उत्साहबुद्धि व महत्वाकांक्षा कमी न होतां त्यानें आपला उद्योग सतत् चालू

---

* ह्यास पीरपांचाल घांट असें म्हणतात. हा काश्मीरच्या पश्चिमेस २४ मैलांवर असून ११४०० फूट उंच आहे.

ठेविला होता. त्यानें ह्यापुढें काश्मीर प्रांताची व डोंगरांतील रस्त्यांची चांगली माहिती करून घेऊन इ. स. १८१९ त आपला दिवाण ' मिसरचंद ' याजबरोबर प्रचंड सैन्य देऊन त्याच्या हाताखालीं सरदार रामदयाळ याची योजना केली. हें प्रचंड शीख लष्कर काश्मीर घेण्याकरितां निघालें असतां मिसरचंदास असें समजलें कीं; काश्मीरचा सुभेदार अझीमखान हा तेथें नसून तो काबूलास कांहीं कामाकरितां निघून गेला आहे व त्याच्या पाठीमागें दुसरा हुशार मनुष्य तेथें कोणी नाहीं; म्हणून मिसरचंदानें दरकूच दरमजल करून काश्मीरानजीक येऊन तेथें आपल्या लष्कराचा मोठ्या बंदोबस्तानें तळ दिला. हें प्रचंड लष्कर आतां सर्व काश्मीरदेश उद्ध्वस्त करून टाकिल्यावांचून राहणार नाहीं असें तेथें ' झबरखान ' नांवाचा एक सरदार होता त्यास वाटून व अफगाण फौजही अस्ताव्यस्त झालेली आहे ती पुन्हां एकत्र करून शत्रूशीं टक्कर मारण्यास कोणी छातीचा सरदार नाहीं अशी त्याची खात्री झाल्यावरून त्यानें काश्मीर मिसरचंदाच्या स्वाधीन केलें. नंतर लवकरच झालेली सर्व हकीगत मिसरचंदानें लाहोर येथें रणजित्‌सिंगास कळविली, तेव्हां आपण कृतकृत्य झालों व मिसरचंदास फारसे आयास न पडतां काश्मीर हस्तगत करून घेतां आलें ह्यावरून आपल्यावर ईश्वराची पूर्ण कृपा आहे असें समजून तो आनंदित झाला. कारण मुलतान घेण्यास जो त्रास व जे श्रम त्यास पडले त्या पेक्षां ह्या मोहिमेंत त्यास कमी त्रास सोसावा लागला. असो. ह्याप्रमाणें काश्मीर प्रांत रणजित्‌सिंगाच्या ताब्यांत आल्यावर त्यानें त्या प्रांताचा बंदोबस्त करण्याकरितां दिवाण मोकमचंदाचा पुत्र ' मोतिराम ' ह्यास तेथील सुभेदार नेमून

पाठविलें. नंतर मिसरचंद आपल्या लष्करासह त्या प्रांतांतून जिकडे तिकडे बंदोबस्त करीत पंजाबाकडे येण्यास निघाला.

वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें मुलतान व काश्मीर हे प्रदेश घेतल्यावर रणजित्सिंगानें 'पेशावर' प्रांत काबीज करण्याचें योजिलें. हा प्रदेश त्यावेळीं अफगाणिस्थानचा राजा 'यार महमदखान' याजकडे होता; आणि त्याचा भाऊ 'महमद अझीमखान' हा वजीर फत्तेखान याच्या मागून त्याचा मुख्य वजीर झाला होता. परंतु त्याचें आणि यार महमदखानाचें पुढें कित्येक कारणांवरून वैमनस्य आलें. त्यापैकीं एक कारण असें होतें कीं, त्यानें म्हणजे यार महमदखानानें रणजित्सिंगाबरोबर स्नेहभावानें वागण्याचा करार केला होता. ह्या वैमनस्याचा परिणाम महमद अझीमखानानें असा केला कीं, तो काबूल येथून आपल्या बरोबर बरेंच सैन्य घेऊन पेशावरास आला, आणि तेथें 'युसफ जाई' लोकांस *जिहाद करून त्यांस त्यानें आपल्याबरोबर घेतलें. नंतर त्यानें तेथून सुमारें ७९ कोसांवर असलेल्या 'नवशेरा' नामक ठाण्यास येऊन त्या नजीकच 'थेरी' म्हणून एक खेडेगांव आहे त्या ठिकाणीं रणजित्सिंगाचें जें थोडेंसें सैन्य होतें त्याबरोबर लढाई दिली. शीख लष्करानें त्यावेळीं मोठ्या शौर्यानें युसफजाई लोकांस रेंटीत रेंटीत काबूल नदीच्या दक्षीण तीरापर्यंत नेलें आणि एक निकराचा हल्ला केला; परंतु त्या हल्ल्यांत रणजित्सिंगाकडील 'फुलासिंग' ह्या नांवाचा एक शूर सरदार पडल्यामुळें शीख सैन्यानें कच

---

* धर्मयुद्धाकरितां उपदेश करणें ह्यास मुसलमानी धर्माचे लोक 'जिहाद' म्हणतात.

खाऊन माघार घेतली; तथापि त्याच नदीच्या उत्तरेकडील बाजूवर शीख सरदार ' हरीसिंग नलवा ' आणि त्याच्या हाताखालील जनरल *' व्हेंट्रा ' जमादार ' खुशाल-सिंग, ' व सरदार ' बुधसिंग सिंधनवाला ' ह्या सर्वांनीं आपलें लष्कर एकत्र करून काबुली लोकांस चोहोंकडून घेरून टाकिलें; तेणेंकरून महमद अझीमखान अगदीं भांबावल्यासारखा होऊन त्यास कांहीं सुचेनासें झाल्यामुळें त्यास पेशावर सोडून देऊन पळून जाणें भाग पडलें.

तदनंतर रणजित्सिंगास दुसरा एक नवीन शत्रू उत्पन्न झाला. तो वायव्येकडील प्रांतांत ' नसिराबाद ' येथील राहणारा असून त्याचें नांव सय्यद अहमदशाहा असें होतें. हा सय्यद धर्मवेडानें धुंद होऊन शीख लोकांचा उघड द्वेष करूं लागला होता. ह्यावेळीं त्यानें कंपनीसरकारासही बराच त्रास दिला असल्यामुळें तें सरकार त्याचा बंदोबस्त करीत असतां तो पेशावरानजीकच्या डोंगरांत जाऊन तेथील रानटी लोकांस त्यानें आपले सहानुयायी बनविलें. हिंदुस्तानांत ' वाहबी ' म्हणून जो एक पंथ आहे त्याची स्थापना ह्याच सय्यदानें केली असें म्हणतात. इ. स. १८२४ त रणजित्-सिंगानें सरदार हरीसिंग नलवा ह्यास हजाराप्रांत घेण्याकरितां पाठवून तेथील ' बरकझाई ' वगैरे लोकांस जिंकून तो प्रांत काबीज केला व त्याची व्यवस्था लाविण्याचें काम्ही त्यानें त्याच शूर सरदाराकडे सोंपविलें. हरीसिंगानें तेथील रहिवाशी मुसलमान लोकांस फार कडक रीतीनें वागविल्यामुळें त्यांनीं ' द्रबंद ' अथवा दरबंद येथें एक मोठें बंड उपास्थित करून

---

* रणजित्सिंगाच्या पदरीं त्या वेळीं जनरल व्हेंट्रा प्रमाणें आणखी दुसरेही परद्वीपस्थ सरदार होते. ह्या सर्वांची हकीकत पुढील भागांत येईल.

हरीसिंगास ते जुमानीनातसे झाले. हें वर्तमान रणजित्सिंगास अमृतसर येथें कळतांच त्यानें बुधसिंग सिंधनवाला ह्यास त्याच्या मदतीस पाठविलें. नंतर त्या उभयतांनीं सय्यद अहमदशहाच्या सुमारें १० हजार रानटी लोकांचा पूर्ण पराजय करून त्या धर्मवेड्या सय्यदास ' अकोरा ' येथें हांकून लाविलें. परंतु इतकें झालें तरी तो स्वस्थ न बसतां त्यानें शीख सरदार बुधसिंग ' जगीरा ' येथें आल्यावर त्यास पुन्हां गांठलें. त्यासमयीं बुधसिंगास दोगरा राजे व अतारी सरदार येऊन मिळाले होते. तेव्हां त्या सर्वांचें मिळून १० हजारांवर सैन्य असून १२ तोफाही होत्या. ह्यावेळीं सदरहू सय्यदाजवळही काबुली, युसफजाई व अफगाण पठाण वगैरे शूर लोकांचा बराच भरणा होता तरी त्यांचा शीख लोकांनीं पराभव करून त्यांस हांकून लाविलें. ह्याचवेळीं ह्या लढाईत सय्यदास पेशावर येथील यारमहमदखानानें अंतस्थ मदत केली होती असा संशय आल्यावरून त्याचें पारिपत्य करण्या करितां स्वतः रणजित्सिंग आपली खास फौज घेऊन अमृतसर येथून निघाला, आणि ' बाला हिस्सार ' येथील राजवाडा जाळून त्यानें तेथील मशीदही भ्रष्ट करून टाकिली. हें वर्त्तमान यारमहमदखानास समजतांच तो पेशावराहून निघून बालाहिस्सार येथें रणजित्सिंगाच्या भेटीस आला, आणि भेटीअंतीं जें कांहीं नजरचुकीनें आपले कडून घडून आलें असेल त्याची माफी मागून त्यानें पूर्वीं रणजित्सिंगास जी खंडणी देण्याचें कबूल केलें होतें तिजपेक्षां आणखी जास्त देण्याचें कबूल करून आपल्या मुलासही रणजित्सिंगाबरोबर अमृतसर येथें ओलीस म्हणून पाठवून दिलें. सारांश, ह्याप्रमाणें रणजित्सिंगाचा विजयध्वज सर्व पंजाबांतच नव्हे तर

उत्तरेकडील डोंगरी प्रदेशांत काबूलनदीपर्यंत फडकूं लागून त्याच्या राज्याची सरहद्द इतउत्तर काबूलनदीच कायम झाली होती.

---

## भाग ५

रणजित्‌सिंगाचें आपल्या फौजेची सुधारणा करण्याकडे लक्ष–त्याकरितां कंपनीसरकारास व फ्रेंचसरकारास त्याची विनंती–परद्वीपस्थ जनरल आलार्ड वगैरेचें आगमन–त्यांचा दरबारांत प्रवेश–दरबारच्या जमावंदीची पद्धत–निरनिराळे कर व कामदार–वगैरे.

मागील भागांत सांगितल्याप्रमाणें रणजित्‌सिंगानें पंजाब-प्रांत व त्याच्या उत्तरेकडील बहुतेक डोंगरी प्रदेश, तसेंच काश्मीर, मुलतान, पेशावर वगैरे प्रांतही आपल्या तरवारीच्या जोरावर एकामागून एक काबीज करून आपल्या राज्याची सरहद्द अफगाणिस्थानांतील काबूलनदीपर्यंत कायम केली; परंतु ह्या एकंदर भानगडींत त्याच्याजवळ जें सैन्य होतें तें इंग्रजी सैन्याप्रमाणें कवाईत शिकलेलें नसल्यामुळें युसफजाई, बरकजाई व काबुली पठाण लोकांस जिंकण्यास त्यास फार त्रास व खर्च सोसावा लागला; म्हणून ह्यापुढें तरी आपलें सैन्य चांगलें तयार होऊन युद्धकलेंत निपुण व्हावें ह्याकडे त्याचें लक्ष लागलें. त्यानें प्रथमतः आपल्या दोस्ताकडे म्हणजे कंपनीसरकाराकडे कांहीं लष्करी अमलदार आपल्या लष्करास कवाईत शिकविण्याकरितां मिळावेत म्हणून मागणें केलें; परंतु त्या सरकारानें त्याची विनंति मान्य केली नाहीं. तेव्हां त्यानें त्यावेळीं हिंदुस्तानांत असलेल्या दुसऱ्या परद्वीपस्थ सरकाराकडे म्हणजे फ्रेंचसरकाराकडे तसेंच मागणें केलें. इतक्यांत दैववशात् असें घडून आलें कीं, जनरल व्हेंटूरा प्रमाणेंच जनरल ' आलार्ड ' ह्या नांवाचा एक इतालियन् सरदार जगद्विख्यात् नेपोलियन बोनापार्टाची नोकरी सोडून उदरंभरणार्थ आशिया खंडांत

फिरत असतां 'हीरात' व 'कंदाहार' ह्या मार्गानें पंजाबांत प्रवेश करता झाला. नंतर तो लाहोर दरबाराकडे आल्यावर रणजित्‌सिंगानें त्याची सर्व हकीकत ऐकून घेऊन व तत्संबंधानें आपली पूर्ण खात्री करून घेऊन त्यास जनरल व्हेंटूरा प्रमाणेंच आपल्या पदरीं ठेवून घेतलें. नंतर कांहीं दिवसांनीं त्याची हुशारी वगैरे पाहून त्यास आपल्या घोडेस्वारांच्या पलटणींवर मुख्य अमलदार नेमिलें. जनरल व्हेंटूरा याजकडे तर त्यानें पूर्वींच खास फौजेच्या मुख्याचें काम दिलेलें होतें. ह्याप्रमाणें कंपनीसरकार व फ्रेंचसरकार ह्या दोन्ही परराष्ट्रीयांची त्या मानी रणजित्‌सिंगानें फारशी गरज न बाळगितां ह्या वरील दोघां सरदारांकडूनच आपल्या सैन्याची सुधारणा करण्याचा बेत मनांत आणून तो बहुतेक अंशीं शेवटासही नेला. त्या परकीय सरदारांनीं आपआपल्या तैनातींतील शिपायांस पाश्चात्य लष्करी शिक्षण देऊन त्या कलेंत त्यांस बरेंच तरबेज केलेलें रणजित्‌सिंगानें पाहून तो फार खुष झाला व त्याबद्दल त्यानें त्या दोघां सरदारांस चांगलें बक्षीसही दिलें. इतकेंच नाहीं तर त्या दोघांवर त्याचा विश्वास बसल्यामुळें त्यानें पुढें जनरल व्हेंटूरा यास लाहोर येथील सुभेदारी देऊन *'काजी' चीं वस्त्रेंही दिलीं; तेणेंकरून तो परकी सरदार लाहोर दरबारांत तिसऱ्या दर्जाचा अमलदार होऊन राहिला.

वरील दोन परद्वीपस्थांखेरीजकरून त्यांच्या मागून लवकरच आणखीही कांहीं युरोपियन गृहस्थ रणजित्‌सिंगानें आपल्या फौज-खात्यांत ठेविले होते. त्यांपैकीं कर्नल 'कोर्ट' नामक फ्रेंच सरदाराकडे गुरखे लोकांच्या दोन पलटणींचें आधिपत्य दिलें

---

* 'काजी' हा आरबी पारिभाषिक शब्द असून त्याचा अर्थ 'न्यायाधीश' असा होतो.

होतें आणि तोफखान्यावर कर्नेल ' गार्डनर ' ह्या नांवाचा एक ऐरिश गृहस्थ मुख्य नेमिला होता. तसेंच ' व्हान् कोर्टलंड ' ह्या नांवाचा दुसरा एक गृहस्थ रणजित्सिंगानें आपल्या लष्करांत ठेविला होता. हा गृहस्थ कोणत्या जातीचा होता, याविषयीं कोठें चांगला खात्रीलायक खुलासा आढळत नाहीं. हा सरदार शीखलोकांचें राज्य नष्ट होईपर्यंत लष्करी खात्यांत होता व नंतर तो कंपनीसरकारच्या मुलकीखात्यांत नोकरीस राहिला. ह्यानें हिंदुस्तानांत इ. स. १८५७ त जें शिपायांचें मोठें बंड झालें त्यासमयीं कंपनीसरकाराची चांगली कामगिरी बजाविली होती असें म्हणतात. जनरल ' अव्हिटेबिले ' ह्या नांवाचा नेपोलियन बोनापार्टच्या घराण्यांपैकीं एक गृहस्थ रणजित्सिंगानें आपल्या पदरीं ठेविला होता, त्याची नेमणूक मुख्यतः राजकीय कामाकडे केलेली होती; तथापि रावी व चिनाब ह्या दोन नद्यांमधील प्रदेशाची* व्यवस्था पहाण्याचें काम त्याजकडे सोंपविलें होतें; पण पुढें कांहीं दिवसांनीं त्याची बदली पेशावर येथें केली. हा स्वभावानें कडक असून, स्वकार्यदक्ष व स्वामिसेवापरायण असल्यामुळें त्यानें त्या प्रांतांत व आजूबाजूच्या डोंगराळ प्रदेशांत राहणाऱ्या रानटी लोकांस जेरीस आणून त्यांवर आपला चांगलाच छाप बसविला होता व अद्यापिही खैबर खिंडींतील व तिच्या आसपास राहणाऱ्या लोकांस ह्या गृहस्थाचें नुसतें नांव निघालें असतां फार दहशत वाटते.

ह्याप्रमाणें रणजित्सिंगाच्या दरबारांत परराष्ट्रीय लोकांचा प्रवेश झाला होता खरा; तथापि तो त्यांवर फार सावधगि-

---

* ह्या प्रदेशास ' रेचना ' दुवाब असें म्हणतात.

रीनें लक्ष ठेवीत असे. एकादेवेळीं ह्या परकीय सरदारांपैकीं कोणास मोहिमेवर जाण्याचा प्रसंग आला असतां, रणजित्‌सिंग मुद्दाम असें करी कीं, आपल्या विश्वासांतील एकादा मोठा शीख सरदार अथवा राजपुत्र *'खडकसिंग' यांपैकीं कोणाची तरी त्या मोहिमेवर मुख्य सेनापती म्हणून नेमणूक करीत असे. विशेषतः शीख सरदारांपैकीं दिवाण मोकमचंदाचीच अशा प्रसंगीं नेमणूक होत असे. असो. रणजित्‌सिंगानें आपल्या फौजेची अशा प्रकारें व्यवस्था लावून जे परकीय सरदार राजकीय कामास योग्य असे वाटले त्यांजकडे तशाच प्रकारचीं कामें दिलीं होतीं. ह्याचें उदाहरण आम्हीं वर दिलेंच आहे. ह्याखेरीज एतद्देशीय शीख सरदार व मुत्सद्दी-लोक रणजित्‌सिंगाच्या दरबारांत बरेच होते. त्यांत दिवाण मोकमचंद याजवर त्याचा पूर्ण विश्वास व कृपा असे. हा शीख सरदार इ. स. १८०६ पासून इ. स. १८११ पर्यंत रणजित्‌सिंगाचा मुख्य सेनाधीश होता. त्याचा नातू रामदयाळ ( हा इ. स. १८२० त हजारा प्रांतावरील स्वारींत मृत्यु पावला. ) मोठा रणपटु होता. तो आणखी कांहीं दिवसपर्यंत वांचला असता, तर तो फारच नांवालौकिकास चढला असता, असें त्यावेळीं सर्वांस वाटूं लागलें होतें. त्याचप्रमाणें दिवाण मिसरचंद हा बनिया अथवा वाणी जातीचा रणजित्‌सिंगाच्या लष्करांत मोठा अमलदार होऊन गेला. ह्या सरदाराचा दुसरे शीख सरदार फार द्वेष करीत असत; परंतु रणजित्‌सिंग स्वतः त्याची कर्तबगारी पाहून मनांत फार खुष झाला होता. ह्याच शूर सरदारानें इ. स.

---

* हा रणजित्‌सिंगाचा पुत्र होता. ह्याची हकीकत पुढील भागांत येईल.

१८१८ मुलतान घेतलें. ह्याशिवाय आणखीही लहानमोठे शीख सरदार रणजित्‌सिंगाच्या लष्करी खात्यांत बरेच होते.

ह्याप्रमाणें रणजित्‌सिंगानें आपल्या राज्याच्या संरक्षणाचें जें मुख्य साधन म्हणजे लष्करीखातें त्याचा चांगला बंदोबस्त केल्यानंतर आपलें लक्ष आपल्या मुलखाचें उत्पन्न वाढविण्याकडे लाविलें. ह्या कामीं त्यानें आपल्या रयतेवर बराच जुलुम चालविला होता. त्यावेळीं त्याच्या राज्याचें एकंदर उत्पन्न सुमारें १८ लक्ष रुपयांजवळ जवळ होतें. त्यानें रयतेवर ४८ बाबी लादिल्या होत्या; आणि त्यांची उगवणी करण्याकरितां जुलमी कामदारांची योजना केलेली होती. एकादा जिन्नस कोणी आपल्या खाजगी उपयोगाकरितां परदेशांतून आणिला असतां त्यावर तीन वेळ जकात घेण्याचें त्यानें ठरविलें होतें व तशी जकात देण्यास कोणी कुरकुर किंवा हरकत केली असतां, त्यास फार कडक रीतीनें शासन करण्याचाही तो कधीं कधीं हुकूम करीत असे. अशा रीतीनें राज्याची जमाबंदी वसूल करण्याकरितां जे अधिकारी नेमिले होते त्यांस ' करदार ' अशी संज्ञा होती; तथापि राज्याचा मुख्य कारभार करणारी मंडळी निराळीच होती. कारभारी मंडळांत दिवाण ' सावनमल्ल ' हा सर्वांत उत्तम होऊन गेला. त्याजकडे रणजित्‌सिंगानें पंजाबच्या दक्षिणेकडील प्रांत म्हणजे मुलतान, देरागाजीखान, खानगड, जंग आणि लिहा ह्या प्रांतांच्या सुभेदारीचें काम सोंपविलें होतें. 'आब्रीएन* नामक एका इंग्रज अधिकाऱ्यानें सावनमल्लाविषयीं आपल्या खलित्यांत असें म्हटलें आहे कीं, " सावनमल्लानें आपल्या ताब्यांतील प्रांताचा कारभार त्यापूर्वीच्या कारभारा-

* Mr. O 'Briens' settlement Report of Muzaffargarh.

पेक्षां फार उत्तम रीतीनें चालविला होता. त्याचा मुख्य उद्देश जेणेंकरून रयतेचें आपल्या हातून कल्याण होऊन राज्याचें उत्पन्न वाढेल तसें करण्याचा होता. त्यानें लोकांच्या जीवितांचें व वित्ताचें रक्षण चांगल्या प्रकारें होण्याकडे विशेष लक्ष दिलें होतें. रयतेस योग्य व वेळच्यावेळीं न्याय मिळणें व शेतकरी लोकांस उत्तेजन मिळून त्यांजकडून शेतकीची सुधारणा होणें ह्या दोन गोष्टी राज्यास चिरस्थायी करणाऱ्या आहेत हें तत्व त्याच्या मनांत पूर्ण बिंबलेलें होतें."

रणजित्‌सिंगाच्या राज्यांतील जकातखात्यावरील मुख्य दिवाणाचें काम 'मिसर रालाराम' ह्या नांवाच्या गृहस्थाकडे होतें; परंतु तो लवकरच मयत झाल्यावर तें त्याचा पुत्र 'राजा साहेब दयाळ' हा पाहूंलागला. रणजित्‌सिंगाचा मुख्य सल्लामसलतगार म्हटला म्हणजे सरदार 'लेहनासिंग' ह्या नांवाचा एक माजिठा रजपूत होता. ह्या लेहनासिंगास पुढ 'हशमद्दौला' हा किताब मिळाला होता. ह्या लेहनासिंगासंबंधानें इतिहासांत एके ठिकाणीं असें लिहिलेलें आढळतें कीं, तो मोठा रसायन शास्त्रवेत्ता असून ज्योतिषशास्त्र सुद्धां त्यास अवगत होतें. त्यानें रणजित्‌सिंगाच्या तोफखान्यांत चांगली सुधारणा करून खुद्द आपल्या अकलेनें कित्येक बंदुका व तोफा शास्त्रीय पद्धतीनें तयार केल्या होत्या; त्यांपैकीं कांहीं तोफा तर पुढें शीख लोकांनीं इ. स. १८४३ त 'अलिवाल' व 'सोब्रान' वगैरे ठिकाणीं इंग्लिशांच्या व त्यांच्या ज्या लढाया झाल्या त्यांत आपल्या बरोबर आणिल्या होत्या. असो.

वर सांगितलेल्या मुत्सद्दी लोकांशिवाय रणजित्‌सिंगाच्या सर्व राजकीय खात्यांवरील मुख्य प्रधानकीचें काम 'राजा

'दिनानाथ' नांवाच्या गृहस्थाकडे होतें. राजा दिनानाथ हा पूर्वीं एक सुखवस्तु पंजाबी ब्राह्मण होता. त्यानें रणजित्-सिंगास वेळोवेळीं योग्य सल्ला देऊन आपल्याकडे त्याचें मन वळवून घेतलें होतें; शिवाय तो फार लोकप्रियही झाला होता. त्याला जेव्हां मुख्य प्रधानकीचीं वस्त्रें मिळालीं तेव्हां त्यानें जमाबंदीकडील व्यवस्था सुधारून पूर्वीं करदार लोकांस वसुलाच्या बाबतींत जे जुलमाचे हुकूम जात असत ते जाण्याचे बंद करून रयतेस सुखी केलें. पुढें रणजित्सिंगाच्या मरणानंतर कंपनीसरकारानें त्या राज्याचा कारभार आपणा-कडे घेतल्यावर लाहोर येथें एक कौन्सिल स्थापून त्याचें प्रमुखत्व राजा दिनानाथ याजकडेसच दिलें होतें. असो. रणजित्सिंगाच्या परराष्ट्रीय वकीलीचें काम एका मुसलमान गृहस्थाकडे होतें. त्याचें नांव 'फकीर अझिझुद्दीन' असें होतें. हा मुसलमान गृहस्थ वैद्यकीच्या धंद्यांतही बराच निष्णात् होता. इ. स. १८०२ त लाहोर शहर रणजित्-सिंगानें काबीज केल्यावर तो 'ऑपथॉल्मिया*' नांवाच्या रोगानें आजारी पडला, तेव्हां फकीर अझिझुद्दीन यानें त्यास औषधोपचार करून बरा केला. हे त्याचे उपकार जाणून रणजित्सिंगानें त्यास कांहीं गांव बक्षीस देऊन आपल्या खानगीकडे त्याची नेमणूक केली. इ. स. १८०८ त कंपनी सरकार व रणजित्सिंग ह्यांच्यामध्यें सतलज नदीच्या दक्षिणे-कडील प्रांतासंबंधानें चकमक झडण्याचा प्रसंग आला होता, तो टाळून कंपनी सरकारचा व रणजित्सिंगाचा जो कायमचा सलोखा झाला त्याचें मूळ फकीर अझिझुद्दीनच होय. इ. स. १८३१ त हिंदुस्तानचा गव्हरनर जनरल लॉर्ड वुईलियम्

* ह्यास मराठींत 'नेत्ररोग' असें म्हणतात.

वेन्टींक यानें ' रूपर ' येथें दरबार भरवून रणजित्‌सिंगास त्या दरबारास येण्याविषयीं बोलावणें केल्यावरून त्यानें आपल्या-तर्फे आपला वकील म्हणून फकीर अझिझुद्दीन यास रूपर येथें पाठविलें होतें. त्याप्रमाणेंच इ. स. १८३५ त काबूलचा अमीर दोस्त महमदखान व रणजित्‌सिंग या उभयतांमध्यें कांहीं कारणावरून तंटा उत्पन्न झाला होता, तो मिटविण्या-करितां काबुलास जाण्यासाठीं ह्याचीच रणजित्‌सिंगानें योजना केली होती. नंतर इ. स. १८३८ त ' फिरोजपूर ' येथें गव्हरनर जनरल ' लॉर्ड ऑकलंड ' यानें जो बडा दरबार भरविला होता, त्यावेळींही रणजित्‌सिंगातर्फे फकीर अझि-झुद्दीनच हजर होता. सारांश, फकीर अझिझुद्दीन फारसा विद्वान् नसतां केवळ आपल्या अंगच्या गुणांनीं रणजित्‌-सिंगाच्या दरबारांत एक उच्च प्रतीच्या दर्जाचा मनुष्य होऊन गेला. फकीर अझिझुद्दीनाप्रमाणेंच त्याचे दोघे बंधुही रणजित्‌सिंगाच्या कारकीर्दींत उदयास आले होते. त्यांपैकीं इमामुद्दीन यास ' फकीर साहेब ' आणि नूरुद्दीन यास ' खलिफा साहेब ' असें म्हणत असत. इमामुद्दीनास अमृतसर येथील गोविंदगड किल्ल्यावरील मुख्य अधिकारी नेमिला होता व नूरुद्दीन यास तशाच प्रकारचा एक मुख्य कामदार केला होता. असो. एकंदरीनें पहातां रणजित्‌सिंगानें आपल्या कारकीर्दींत जातिभेद लक्षांत न आणितां केवळ सद्गुण व हुशारी वगैरेवर लक्ष देऊन आपल्या दरबारची स्थापना केली, व कांहीं काळपर्यंत् अशा लोकांच्या हातून आपला राज्यशकट अबाधितपणें चालवून घेतला, हें त्यास अतिशय भूषणास्पद झालें यांत संशय नाहीं.

## भाग ६

रणजित्‌सिंगाच्या शारीरिक स्थितीचें वर्णन–त्याची संपत्ती– कोहिनूर व लाली घोडी–तत्संबंधाची हकिकत–इत्यादि

रणजित्‌सिंगाचा जन्म बाल्यावस्थेपासून तहत तो पूर्णावस्थेंत येईपर्यंत दगदगींत गेला असें मागील विवेचनावरून सहज लक्षांत येण्याजोगें आहे. तो बारा वर्षांचा झाला नाहीं तोंच पितृसुखास अंतरला, त्या योगानें त्यास विद्यासुखास मात्र आंचवावें लागलें. त्यास सुमारें चाळीशीच्या आंतच लढाया, संकटें व त्रास हीं भरपूर मिळालीं होतीं म्हणून तो अगदीं निगरगट्ट असा बनला होता. इतकेंही असून पुढें कांहीं दिवसपर्यंत तरी त्यानें मिळविलेल्या ऐश्वर्यसुखाचा उपभोग घ्यावयाचा होता! परंतु कर्मगतीनें त्यास घेरिल्यामुळें त्याही सुखास तो अंतरला. कारण पूर्वीं म्हणजे इ. स. १८०२ त त्यास जी नेत्ररोगाची भावना उत्पन झाली होती तिचा प्रतिकार बरोबर रीतीनें न झाल्यामुळें ती तशीच राहून तिचा परिणाम त्याच्या शरीरावर घडून त्यापासून त्याची दिवसेंदिवस फारच खराबी होऊं लागून शरीर कमताकद होऊं लागलें. इ.स. १८२४ त कोणी ‘ मरे ’ ह्या नांवाच्या एका इंग्रज नेत्रवैद्यानें त्यास औषधोपचार सुरू केला; परंतु त्या औषधोपचारानें त्याच्या प्रकृतीचें मान चांगलेंसें सुधारलें नाहीं; तरी पण रणजित्‌सिंगानें आपल्या अंगलटीच्या बळकटीच्या जोरावर सुमारें १० वर्षे तशींच रेंटीत नेलीं. ह्यामुळें शरीर पुढें अधिक कमजोर झालें असतां इ. स. १८३४ त त्यास अर्धांगवायूनें गांठिलें. ह्या दुष्ट वायूचा झटका बसल्यावर तर रणजित्‌सिंगाची प्रकृति

अत्यवस्थ झाली, तेव्हां 'एम ग्रेगर' नामक इंग्रज वैद्यानें त्यास त्या विकारावर औषध सुरू केलें, पण त्याचा फारसा उपयोग न होतां एवढेंच मात्र झालें कीं, तो आपल्या बिछान्याला खिळून मात्र राहिला नाहीं. इतक्या अल्प-वयांत असा भयंकर रोग जडण्याचें कारण असें सांगतात कीं, तो विषयसुखाच्या नादांत निमग्न असतां त्यास मध्यंतरीं मद्यपानाचाही बराच नाद लागला होता. इ. स. १८३७ त पुन्हां त्यास ह्या दुष्ट वायूनें पछाडिलें. ह्यावर्षी त्याच्या नातवाचें म्हणजे 'नवनिहालसिंगाचें' लग्न झालें. हा लग्न-समारंभ त्यावेळीं फार अद्वितीय झाला होता. ह्या समारंभास रणजित्‌सिंगानें मोठे मोठे इंग्रज अधिकारीही कलकत्त्याहून बोलाविले होते. त्यांत सर्व हिंदुस्तानचे सेनाधिपती 'सर हेनरी फेन' हेही आले होते; परंतु ह्या बडया इंग्रज काम-दाराची व रणजित्‌सिंगाची मुलाकत त्याप्रसंगीं झाली नाहीं. ह्याचें कारण असें सांगतात कीं, रणजित्‌सिंग दारू पिऊन तिच्या अमलांत अगदीं तर्र होऊन गेल्यामुळें तो अगदीं एकीकडे जाऊन पडला होता. अशा स्थितींत तो असतां त्यास अर्धांग वायूनें पुन्हां गांठिलें, यामुळें त्याची पूर्वीची शक्ति ढांसळून तो उत्तरोत्तर अगदीं कमकुवत होत चालला. तेव्हां ही संधी साधून जम्मू संस्थानचे अधिपती 'राजा ध्यानसिंग' व 'गुलाबसिंग' हे लाहोर दरबारांत कोणास जुमानीनातसे होऊन त्यांनीं एकच गोंधळ उडवून दिला. फकीर अझिझुद्दीनासारखी स्वामिसेवापरायण मंडळी होती परंतु ती रणजित्‌सिंगाच्या शुश्रूषेंत गढून गेल्यामुळें त्यांचें लक्ष दरबारच्या घोंटाळ्या-कडे नव्हतें. त्यांचा जीव आपल्या धन्याच्या आरोग्यतेकडे लागला होता. त्यांनीं रणजित्‌सिंगास आराम पडण्याविषयीं

नाना तऱ्हेचे प्रयत्न चालविले होते. कलकत्त्याच्या गव्हरनर जनरलास हें वर्त्तमान कळतांच त्याजकडूनही चांगले नामांकित असे इंग्रज हाकीम आले होते; परंतु त्यांस देखील ह्या कामीं यश आलें नाहीं. ह्याप्रमाणें जो पंजाबांत व त्याच्या उत्तरेकडील प्रदेशांत सिंहासारखा गर्जत होता व ज्याचा दरारा त्यापेक्षां बलाढ्य अशा कंपनीसरकारासही वाटत होता, तो रणजितसिंग दुर्दैवानें रोगग्रस्त होऊन दीनासारखा आपल्या बिछान्यावर पडून राहिला. असो. त्यानें जी संपत्ति मिळविली होती तींत अति मौल्यवान् असा ' कोहिनूर ' नामक जगविख्यात् एक हिरा होता. ह्या रत्नासंबंधानें ग्रंथांतरीं असें लिहिलेलें आढळतें कीं, हा हिरा कौरवपांडवांच्या वेळीं धर्मराजाच्या मुकुटावर बसविलेला होता. त्यानंतर तो इसवी सनाच्या सोळाव्या शतकांत दिल्लीचे बादशहा शहाजन व औरंगजेब ह्यांच्या ताब्यांत आला. नंतर प्रसिद्ध लुटारू इराण देशाचा बादशहा नादीरशहा ह्यानें हिंदुस्तानावर स्वारी करून इ. स. १७३८ त दिल्ली लुटिली, त्यावेळीं त्या लुटींत त्यास तो हिरा मिळाला. तदनंतर अहमदशहा अबदल्ली ह्या दुराणी सरदारानें त्यास ठार मारून तें बहुमोल रत्न आपल्या स्वाधीन करून घेतलें; आणि शेवटीं इ.स. १८१३ त तें आमच्या चरित्रनायकाच्या हस्तगत झालें. तो प्रकार असा.

काबूलचा राजा शहासुजा ह्यास त्याच्या भावानें पदच्युत केल्यावर त्यानें आपण निराश्रित झालों असें पाहून रणजित्सिंगाच्या आश्रयास येऊन राहण्याचा विचार केला आणि त्याप्रमाणें शहासुजाची बायको शहाबेगम इनेंही रणजित्सिंगास निरोप पाठविला कीं, ' तुम्ही काबुलास येऊन

आमचा पक्ष धरून आमचें संरक्षण कराल तर मजजवळ असलेला कोहिनूर हिरा मी तुम्हास बक्षीस देईन.' ह्या वचनावर रणजित्सिंगानें भरंवसा ठेवून आपल्या हुशार व विश्वासू सरदार दिवाण मोकमचंदास शहासुजास त्याच्या कुटुंबास लाहोर येथें आणण्याकरितां सैन्य देऊन रवाना केलं. परंतु हें सैन्य जाण्यापूर्वींच शहा आपल्या जनानखान्यासह पेशावरास येऊन दाखल झाला होता. मोकमचंदाची व शहासुजाची तेथें भेट झाल्यावर मला ' महाराज रणजित्सिंगानें तुम्हास लाहोर येथें आणण्याकरितां पाठविलें आहे ' असें मोकमचंदानें सांगितल्यावरून शहास अत्यानंद होऊन लागलीच आपल्या सर्व माणसांसह त्यानें लाहोरास जाण्याची तयारी केली. नंतर हें सर्व खटलें लाहोर येथें आल्यावर बेगमनें आपल्या वचनाप्रमाणें तो हिरा अत्यादर पूर्वक रणजित्सिंगास नजर देऊन त्याचे फार आभार मानिले. ह्या गोष्टींत किती तथ्य असेल तें असो. परंतु शहासुजानें खुद्द ह्या रत्नासंबंधानें एके ठिकाणीं असें म्हटलेलें आढळतें कीं, तो जेव्हां रणजित्सिंगाच्या आश्रयास येऊन राहिला, तेव्हां रणजित्सिंगानें त्याच्याजवळ कोहिनूरहिरा मागितला. परंतु कोंहिनूर आपल्याजवळ नाहीं असें शहानें स्पष्टपणें सांगितल्यावर त्यास त्याचा संशय आला. नंतर शहासुजास आपल्या राज्यांतील कांहीं जमीन त्या हिऱ्याच्या मोबदला देण्याचें रणजित्सिंगानें वचन दिलें; तथापि त्यानें त्याचें मागणें अमान्य केलें. ह्यावरून रणजित्सिंगास त्याचा राग येऊन त्यानें शहास त्याच्या कुटुंबासह अमृतसर येथील गोविंदगड किल्ल्यांत कैदेंत ठेविलें. नंतर तेथें शहासुजाची व त्याच्या कुटुंबाची दोन महिनेपर्यंत रणजित्सिंगाच्या

हुकुमावरून बरीच हालअपेष्टा झाल्यावर आपल्यास आणखी किती दिवसपर्यंत कारागृहवास भोगावा लागेल ह्याचा नेम नाहीं असें पाहून शहासुजानें अति नम्रपणानें कोहिनूर देण्याचें कबूल केलें; तथापि त्या वचनावर रणजित्सिंगाचा विश्वास बसेना म्हणून एके दिवशीं तो अमृतसर येथें येऊन किल्ल्यांत कैदी असलेल्या शहासुजास जाऊन भेटला. त्या-वेळीं शहानें आपल्याजवळच्या संदुकींतून तें अप्रतिम रत्न बाहेर काढून रणजिताच्या हातांत दिलें. तें घेऊन त्याजकडे पहात असतां त्याची वृत्ति क्षणभर तटस्थ झाली. नंतर त्यानें असा विचार केला कीं, ह्या रत्नाप्रमाणेंच आणखीही कांहीं रत्नें शहाजवळ असलीं पाहिजेत; म्हणून लोभातिशयानें तो हिरा घेऊन निमूटपणें किल्ल्याबाहेर आला व भाईराम-सिंग नांवाच्या सरदाराबरोबर आपल्या राण्यांपैकीं एका राणीस देऊन त्यांस शहासुजा ज्याठिकाणीं आपल्या कुटुंबा-सह रहात होता त्याठिकाणची झडती घेण्याकरितां ताबडतोब रवाना केलें. ही झडती घेणारी मंडळी किल्ल्यांत शिरल्यावर त्यांनीं शहापासून तों त्याच्या नोकरचाकरांसुद्धां झडती घेऊन जनानखान्याचीही पण तशीच व्यवस्था केली, व जें जें कांहीं चमत्कारिक व मौल्यवान् असें आढळलें, तें तें त्यांनीं आपल्या बरोबर घेऊन रणजित्सिंगास दाखविण्या करितां लाहोरास गेले. असो. ह्या कोहिनूर हिऱ्यासंबंधानें अनेक प्रकारच्या अनेक दंतकथा आहेत, परंतु त्यांविषयीं विचार करण्याची ह्याठिकाणीं तादृश गरज नाहीं. मात्र एवढें खचित् कीं, कोहिनूर हिरा रणजित्सिंगानें काबूलच्या पदभ्रष्ट राजापासून मिळविला.

वाचकहो, वर निर्दिष्ट केलेली गोष्ट निर्जीव रत्नासंबंधानें

झाली. परंतु रणजितसिंगाजवळ असेंच एक अप्रतिम सजीव रत्न होतें. तें रत्न म्हटलें म्हणजे लाली ह्या नावाची एक सर्वोत्कृष्ट घोडी होय. तिची हकीकत अशी. ही घोडी पेशावर येथील सुभेदार यारमहमदखान याच्या ताब्यांत होती. रणजित्‌सिंगानें त्या घोडीची कीर्ति ऐकून इ. स. १८२६ त सदरहू खानाकडे तिजविषयीं मागणें केलें; परंतु खानानें त्याकडे दुर्लक्ष केलें असें पाहून रणजित्‌सिंगानें आपला सरदार बुधसिंग ह्याच्या हाताखालीं कांहीं लष्कर देऊन आपला अपमान करणाऱ्या सुभेदारावर पेशावरास पाठविलें. तेव्हां हें यारमहमदास कळतांच त्यानें ती घोडी नुकतीच मरण पावली अशी खोटीच भुमका उठविली. तेव्हां बुधसिंगानें ह्या गोष्टीचा बारीकरीतीनें शोध करून लाली घोडी मेली नाहीं अशी खात्रीपूर्वक माहिती काढून व हें यारमहमदाचें कृत्रिम आहे असें जाणून रणजित्‌सिंगास हें वर्त्तमान कळविलें त्यावरून रणजित्‌सिंगास ह्या दगलबाजीचा अतिशय राग येऊन त्यानें लाहोर येथून आपला पुत्र खडकसिंग यास बुधसिंगाच्या कुमकेस पाठवून दिलें, आणि त्यास त्यावेळीं असेंही फर्माविलें होतें कीं, 'एकतर खानानें ती घोडी बिनहरकत तुमच्या स्वाधीन करावी हा उत्तम पक्ष; नाहींतर त्यानपासून ती जबरीनें काढून घेऊन त्यास सुभेदारीवरून एकदम दूर करावें." ह्याप्रमाणें खडकसिंगास हुकूम होतांच त्यानें आपलें सैन्य पेशावराकडे चालविलें. तो दरकूच दरमजल करीत चालला असतां यारमहमदाच्या हेरांनीं हें वर्तमान त्यास जाऊन कळविलें. तेव्हां तेथून त्यानें पोबारा करून पेशावरानजीकच्या एका डोंगरांत तो छपून बसला इकडे खडकसिंग पेशावरास जाऊन पाहतो तों यारमहमद

तेथें नसून तो लाली घोडीसह कोणीकडे पळून गेल्याचें त्यास आढळून आलें, म्हणून त्यानें व सरदार बुधसिंगानें त्याचा पत्ता लाविण्याचे जे जे उपाय होते, ते ते सर्व करून पाहिले; परंतु ते व्यर्थ गेले असें पाहून निराश होत्साते ते दोघेही आपआपल्या लष्करासह लाहोर येथें परत आले.

रणजित्सिंगाचा स्वभाव पूर्वीपासूनच फार दुराग्रही असल्याकारणानें त्यानें लाली घोडी प्राप्त करून घेण्याकरितां यत्न करण्याचें न सोडितां जनरल व्हेंट्टरा यास पेशावरास जाऊन कोणत्यातरी उपायानें घोडी हस्तगत करून घेण्याचा हुकूम सोडिला. ह्यावेळीं जनरल व्हेंट्टरा हा अटक येथें आपल्या फौजेसह होता. त्यास हा वरील हुकूम येऊन पोहोंचतांच तो अटकेहून पेशावरास जाण्याकरितां तावडतोब निघाला. परंतु त्यास पूर्वी सांगितलेला खलिपा सय्यद अहमद ह्यानें मध्येंच अडवून धरिलें. ह्याचें कारण जो यारमहमदखान पेशावराहून पळून गेला होता असें आम्ही वर निर्दिष्ट केलें आहे तो, खलिपा सय्यदाच्या आश्रयाखालीं येऊन राहिला होता; व शिवाय त्या सय्यदाचा रणजित्सिंगानें पूर्वी एकदां पराभव करून त्याचा फार नाश केला होता म्हणून त्याचा सूड उगविण्याच्या हेतूनें त्यानें व्हेंट्टराच्या सैन्यास अडवून धरिलें यांत नवल नाहीं. सय्यदाच्या व व्हेंट्टराच्या लोकांची कांहीं वेळपावेतों धुमश्चक्री उडून त्यांत यारमहमदखान तर ठार झालाच; परंतु सय्यदानें आपल्या लोकांस शत्रू अद्यापि अजिंक्य आहे असें सांगून डोंगराच्या आश्रयाचा मार्ग स्वीकारिला. अशा रीतीनें जनरल व्हेंट्टरा यास त्या रानटी सय्यदावर जय मिळाल्यामुळें तो मनांत मांडे खाऊं लागला व पेशावरास

घेल्यावर आपण ज्या वस्तूबद्दल विडा उचलून आलों आहों ती वस्तू आपल्या हस्तगत होण्यास आतां बिलकुल विलंब लागणार नाहीं असें त्यास वाटूं लागलें. पण हे मनांतील मांडे मनांतच राहिले. कारण यारमहमदखानाचा भाऊ सुलतान महमदखान यास आपल्या बंधूचा वियोग सहन न होऊन त्यानें जनरल व्हेंटूराचा उघड सूड घेण्याचा निश्चय केला; परंतु हा त्याचा बेत मुळींच सिद्धीस गेला नाहीं. जनरल व्हेंटूरा यानें त्यास असें स्पष्ट सांगितलें कीं, "जर तुम्ही लाली घोडी आमच्या स्वाधीन करणार नाहीं, अथवा ती कोठें आहे ह्याचा पत्ता लावून देणार नाहीं तर यारमहमदखानाप्रमाणेंच तुमची दशा निःसंशय झाल्यावांचून राहणार नाहीं; कारण त्या घोडी प्रीत्यर्थ रणजितसिंगास बराच खर्च होऊन प्राण हानिही बरीच झाली आहे हें लक्षांत ठेवावें."

जनरल व्हेंटूराच्या ह्या धमकावणीस त्या सुलतान महमदानें मुळींच भीक घातली नाहीं. त्यानें व्हेंटूरा यास बऱ्याच थुलथापी देऊन कांहीं दिवसपर्यंत त्यास तसेंच वाट पहाण्यास लाविलें. शेवटीं व्हेंटूरानें ही त्याची थापाथापी लक्षांत आणून असें केलें कीं, एके दिवशीं तो सुलतान महमद आपल्या वाड्यांत असतां आपल्या लष्करास हुकूम देऊन त्याजकडून वाड्यास गराडा घालविला आणि असें सांगून पाठविलें कीं, जर लाली घोडी आज आमच्या स्वाधीन झाली नाहीं तर तुम्हांस ह्याच वाड्यांत आजन्म हाल भोगीत रहावें लागेल. असा निरोप पोहोंचल्यावर सुलतान महमदानें विचार केला कीं, आपल्या भोंवतीं शत्रूनें वेढा देऊन आपल्यास कोंडून धरिलें आहे व तो फार बलाढ्यही आहे, म्हणून ह्यांतून आपण पार पडून जाऊं अशी आपल्यास खात्रीही नाहीं, ह्या कारितां

त्यांचें इच्छित जी लाली घोडी ती त्यांच्या स्वाधीन केल्या-विना आपणास दुसरा तरणोपाय उरला नाहीं. असा विचार करून त्यानें ती घोडी लागलीच जनरल व्हेंटूराच्या स्वाधीन केली. ह्याप्रमाणें जनरल व्हेंटूरा यशस्वी होऊन त्या अमोल्य सजीव रत्नासह थोडक्याच दिवसांनीं लाहोर येथें दाखल झाला. ज्यावेळीं जनरल व्हेंटूरा लाहोरास येऊन पोहोंचला त्या-वेळीं रणजित्सिंगास अत्यानंद झाला. आणि ज्या वस्तूची फार दिवसांपासून त्यास अपेक्षा होती व जी मिळविण्या-करितां त्याचें द्रव्य व प्राणहानि झाल्याचें दुःख इतका वेळपावेतों त्यास वाटत होतें, तें तो ती घोडी जनरल व्हेंटूरानें प्रत्यक्ष त्याच्यापुढें आणून उभी केल्यावर अगदींच विसरून गेला. सारांश, रणजित्सिंग इतके दिवस ज्या दोन अमोल्य वस्तूंची कीर्ति ऐकत होता व ज्या मिळविण्या-करितां त्यानें जे प्रयत्न केले ते शेवटीं सफल होऊन त्याची मनीषा तृप्त झाली.

## भाग. ७

रणजित्‌सिंगाच्या जनानखान्याची स्थिति–त्याचा मृत्यु–राजपुत्र खडकसिंग–त्याचें राज्यारोहण–जम्मूराजे ध्यानसिंग व गुलाबसिंग–खडकसिंग व नवानिहालसिंग यांचे खून–धूलिपसिंग–रणजित्‌सिंगाचा प्रेत विधि–इत्यादि इत्यादि.

वाचकहो, वरील सहा भागांत रणजित्‌सिंगाच्या पूर्वजांपासून तों त्याचें कर्तृत्व नष्ट होईपर्यंत आम्ही सर्व हकीकत थोडक्यांत नमूद केली आहे. त्यानें अगदीं बाळपणापासून शौर्याचीं कामें करून आपलें नांव जगांत अजरामर करून ठेविलें ही गोष्ट पाश्चात्त्य इतिहासकारांसही मान्य असल्यामुळें आम्हां भारतवर्षीयांस त्याबद्दलचा जितका अभिमान व जितकी थोरवी वाटेल तितकी थोडीच आहे. त्यावेळच्या कालदेशवर्तमानरीत्या विचार करून पाहिलें असतां ज्यानें आपल्या बाहुबलानें सर्व यूरोपखंडास थक्क करून सोडलें अशा फ्रान्स देशाच्या नेपोलियन् बोनापार्टाची थोरवी व कीर्ति जगांत अद्यापपावेतों जशी दुमदुमून राहिली आहे तसा आमच्या पंजाबी सिंहाचा यशोदुंदुभी आजवर जो गाजत आहे त्याबद्दलचा आम्हां आर्यांस अभिमान वाटणार नाहीं असें कालत्रयीं होणार नाहीं. असो. या पूर्वींच्या प्रकरणांत रणजित्‌सिंगाच्या राज्य प्रकरणीं व्यवस्थेसंबंधानें आम्हांस जी माहिती मिळाली, तिचें थोडक्यांत परंतु संपूर्ण वर्णन केलें आहे. आतां या पुढील भाग म्हणजे रणजित्‌सिंगाच्या कारकीर्दीचा उत्तरार्धच समजला पाहिजे. असें म्हणण्याचें कारण हें कीं, ह्यापुढें त्याची कारकीर्द अगदीं संपत आली होती. त्यास पूर्वी सांगितल्या-

प्रमाणें अर्धांगवायूसारख्या प्राणघातक वायूनें पुरें ग्रासिलें होतें, तेणेंकरून तो आपला बिछाना धरून निपाचित पडला होता. त्याच्या जनानखान्याची स्थितिही त्यावेळीं बरीच बिघडली होती. परंतु ती सुधारण्यास ह्यावेळीं त्यास मुळींच ऊर्जा उरली नव्हती. ह्यामुळें तो जरी सिंहाप्रमाणें गर्जत होता तरी त्यास जें असह्य दुखणें जडलें होतें त्यामुळें तो अगदीं दीन गाय होऊन गेला होता. त्याच्या जनानखान्यासंबंधानें कांहीं ठिकाणीं असे प्रलाप निघालेले आढळण्यांत येतात कीं ते ऐकिले किंवा ग्रंथांतरीं लिहिलेले वाचिले असतां तत्संबंधानें आपल्या मनाची स्थिति निदान तात्पुरती तरी खचित् विपरीत होऊन जाईल यांत संशय नाहीं; तथापि प्रसंगविशेषीं ह्यासंबंधाची त्रोटक माहिती ह्या भागांत आम्हांस दिल्यावांचून गत्यंतर नसल्यानें ती आमच्या वाचकांच्या नजरेखालून जाणार आहे.

रणजित्सिंगास औरस व अनौरस असे पुत्र होते. त्यांपैकीं राजपुत्र खडकसिंग हा एक औरस पुत्र असून त्याचें त्याजवर खरें प्रेम होतें. एकंदर त्यास अठरा बायका होत्या; त्यांपैकीं फक्त लग्नाच्या नऊ असून बाकीच्या रखेल्या होत्या. ह्या अठरा स्त्रियांत कांहीं शीख रजपूत स्त्रिया व कांहीं मुसलमानशीख स्त्रिया होत्या, त्यांत त्याचें ज्यांवर विशेष प्रेम होतें व ज्यांपासून वंशवृक्ष वाढला अशांचेंच वर्णन आम्ही येथें देतों.

आमच्या वाचकांच्या लक्षांत असलेच कीं, रणजित्सिंगाचें पहिलें लग्न त्याच्या सहाव्या वर्षी म्हणजे इ. स. १७८६ त कन्हैय्या मिसलीचा बलाढ्य सरदार जयसिंग ह्याच्या नातीबरोबर झालें. तिची आई सदाकुवर ही मोठी कारस्थानी

बायको असल्याचें आम्ही मागें एके ठिकाणीं लिहिलेलें वाचकांस आठवत असेलच. तिनें राजपुत्र खडकसिंगावर रणजित्सिंगाची अत्यंत प्रीति आहे असें जाणून व हाच पूर्णपणें लाहोर येथील गादीचा मालक होईल असें समजून विचार केला कीं, आपल्या मुलीस पुत्र संतान होऊन तो पुढें राज्यास अधिकारी व्हावा म्हणून इ. स. १८०९ त तिनें नूतन जन्मास आलेला असा एक पोरका मुलगा मिळवून व तो आपल्याच कन्येच्या उदरीं जन्मास आला असें प्रसिद्ध करून त्याचें नांव ईसरसिंग असें ठेविलें, परंतु तो मुलगा सुमारें दीड वर्षांचा होऊन मृत्यु पावला; तेव्हां पुढच्या वर्षी म्हणजे इ. स. १८०७ त रणजित्सिंग सिस् सतलज प्रांतावर स्वारी करण्याकरितां गेला ही संधी साधून त्या उपद्व्यापी बाईनें महताब कुवर गरोदर असल्याचें प्रसिद्ध करून तो परत आल्यावर त्याजपुढें दोन अति लहान अर्भकें आणून ठेविलीं. वास्तविक पहातां ह्या दोन मुलांपैकीं एक मुलगा लाहोर येथील एका फेरीवाल्याचा होता; व दुसरा तिनें आपल्याच एका दासीपासून जन्मतःच विकत घेऊन ते जुळेच जन्मास आले असें जाहीर केलें. रणजित्सिंगानें प्रथम दर्शनी त्या दोन्ही मुलांकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं; कारण तो आपल्या सासूस पुरा ओळखून होता. त्यानें असा विचार केला कीं, ह्या खटपटी स्त्रीच्या कृत्रिमाचा आजच विचार केल्यास कदाचित् भलतेंच एकादें लचांड ती उपस्थित करील. याकरितां तो दुसऱ्या वर्षी पुन्हां कंपनी सरकारबरोबर सिस्–सतलज प्रांतासंबंधानें तडजोड करण्याकरितां निघाला तेव्हां आपल्या सासूच्या आग्रहास्तव ते आवळे जावळे मुलगे आपलेच आहेत असें म्हणून त्यानें त्यांस

'राजपुत्र' अशी संज्ञा दिली. ह्या दोन मुलांपैकीं एकाचें नांव तारासिंग व दुसऱ्याचें नांव शेरसिंग असें ठेविलें होतें. तारासिंग हा मूर्ख होता; शेरसिंग हा तारासिंगाप्रमाणें मूर्ख तर खराच, पण सुंदर असून कांहींसा शूर होता. शेरसिंगास खडकसिंगाचा पुत्र नवनिहालसिंगाच्या मागून पंजाबची गादी कांहीं दिवस मिळाली होती. त्यास इ. स. १८४३ त सिंधनवाला शीख सरदारांनीं मारेकऱ्यांकरवीं ठार मारिलें.

रणजित्सिंगाचें दुसरें लग्न नक्काई मिसलीचा मुख्य रामसिंग ह्याच्या राजकुवर नामक कन्येबरोबर इ. स. १७९८ त झालें. तिच्या उदरीं इ. स. १८०२ त राजपुत्र खडकसिंग' जन्मास आला. ह्या खडकसिंगावर रणजित्सिंगाची अत्यंत प्रीति असे हें आम्ही मागें सांगितलेंच आहे. हा आपल्या बापाप्रमाणेंच शूर होता; तथापि तो कांहींसा हलकट स्वभावाचा असल्यामुळें त्याचें तेज त्या दरबारांत व हाताखालच्या लोकांवर फारसें पडत नसे तो आपल्या बापास वेळोवेळीं लढाईच्या किंवा स्वारीच्या कामीं चांगली मदत करीत असे. त्यास बरेच प्रतिस्पर्धी होते, त्यांत जम्मूसंस्थानवाले मुख्य होत.रणजित्सिंगाच्या पश्चात् खडकसिंगास पंजाबची गादी प्राप्त झाली, तिचा त्यानें थोडे दिवस उपभोग घेतल्यानंतर त्याचे प्रतिस्पर्धी जे वर सांगितलेले जम्मू सरदार त्यांनीं त्यास विषप्रयोग करवून निजधामास पाठवून दिलें. इतकेंच करून ते दुष्ट संतुष्ट राहिले असें नाहीं. तर त्याचा एकुलता एक पुत्र–नवनिहालसिंग–यासही त्यांनीं तो आपल्या बापाचें म्हणजे खडकसिंगासचें उत्तर कार्य करून परत येत असतां वाटेंत गुप्तपणें मारेकरी घालवून ठार केलें !! असो.

रणजित्‌सिंगाच्या वरील दोनच स्त्रिया फक्त राजकुलोत्पन्न होत्या. त्यांशिवाय आणखी बऱ्याच सुंदर स्त्रिया, बायका म्हणून त्यानें आपल्या जनानखान्यांत आणून ठेविल्या होत्या. त्यांपैकीं **मोरन** नामक स्त्रीवर त्याचें विशेष प्रेम होतें. ही स्त्री रणजित्‌सिंगाचा एक मुसलमान जातीचा हलक्या दर्जाचा नोकर होता त्याची मुलगी होती. तिला इ. स. १८०६ त त्यानें आपल्या जनानखान्यांत आणिलें. मोरनवर तो इतका फिदा झाला होता कीं, दिवसांतून एक वेळतरी तिचें मुखावलोकन केल्याविना त्यास कांहीं सुचत नसे. त्यामुळें त्याच्यावर इतर स्त्रियांपेक्षां तिचेंच वर्चस्व जास्त बसलें होतें. तिनें त्याजपासून आपल्यास फिरोजपूर बक्षीस करून घेतलें होतें. फार काय सांगावें ? तिच्या आधीन तो इतका झाला होता कीं ईस्ट इंडिया कंपनीच्या टांकसाळेंत त्यानें तिच्या नांवाचें स्वतंत्र नाणें सुद्धां पाडिलें होतें !

इ. स. १८३३ त रणजित्‌सिंगानें अमृतसर येथील एक मुसलमान सरदारकन्या गुल्‌बेगम् इजबरोबर लग्न लाविलें. हा लग्नविधि त्या रजपूत शीख राजानें महमदीशास्त्राप्रमाणें केला होता. आम्ही मागें सांगितलें आहे कीं, शीखधर्म हा हिंदू व मुसलमानी ह्या दोन धर्मांतील तत्त्वांशांपासून नानक याणें स्थापित केला; म्हणून गुल्‌बेगम् बरोबर रणजित्‌सिंगाचें जें हें लग्न झालें तें त्या धर्मास अनुसरूनच असल्यामुळें त्यांत कांहीं विशेष मानण्याजोगें नाहीं. असो. त्याखेरीज झिंदन नांवाची एका घोडेवाल्याची मुलगी रणजित्‌सिंगाच्या जनानखान्यांत होती. तिच्या बापाचें नांव मानसिंग असें होतें. ती अतिशय खुबसुरत असल्यामुळें यः कश्चित घोडेवाल्याची मुलगी होती तथापि तो तिच्या सौंदर्यास भुलून नेहमीं

तिच्या सहवासांत निमग्न झाला होता. झिंदनच्या अंगीं खुषमस्करीपणा व गायन आणि नर्तन हे गुण पूर्णपणें भरलेले होते. इ. स. १८३८ त रणजितसिंग अर्धांगवायूनें पूर्ण घेरिल्यामुळें बेमार झाल्यावर त्यास जनानखाना अर्थातच वर्ज करावा लागला, तेव्हां झिंदन मन मानेल तसा अविचार करण्यास प्रवृत्त झाली; तेणेंकरून तिची छीः थूः होऊन तिला जनानखन्यांतून हांकून दिलें. ज्यावेळीं तिला जनानखान्यांतून घालविलें त्यावेळीं ती गरोदर होती, परंतु ती ह्यापूर्वींच गुलू नांवाच्या भिस्त्यावर लुब्ध असल्याकारणानें तिच्या गरोदरपणाविषयीं दरबारी व जनानखान्यांतील लोकांस संशय उत्पन्न झाला होता. रणजितसिंग दुसऱ्या वर्षीं म्हणजे इ. स. १८३९ त जून महिन्याच्या २७ व्या तारखेस त्या भयंकर रोगानें अतिशय पीडित होऊन निवर्तला. मरणकालीं राजपुत्र खडकसिंग यास आपल्या सन्निध बोलावून आणून त्यास आपल्या गादीचा मालक करून राजा ध्यानसिंग व गुलाबसिंग ह्या दोन संस्थानिकांस आपल्या मुख्य वजिरातीचीं वस्त्रें दिलीं.

झिंदन जनानखान्यांतून निघून जम्मू येथें आल्यावर तिनें कोणा लालसिंग नांवाच्या सरदाराचा अंगिकार करून स्वैच्छाचारानें वागूं लागली. तिला थोड्याच दिवसांनीं पुत्र झाला, त्याचें नांव 'धुलीप' असें ठेविलें. हा धुलीप पुढें धुलिपसिंग ह्या नांवानें प्रसिद्धीस येऊन खडकसिंगाच्या मागून राज्याचा मालक ठरला. ह्याच्या औरसपणाबद्दल त्यावेळीं बरेच अपवाद उत्पन्न झाले होते. कित्येकांचें असें मत होतें कीं, धुलिपसिंगाची आई झिंदन नसून दुसरी कोणी चांगल्या कुलांतील स्त्री असावी. पण ह्या गोष्टीस कोठें चांगलासा

आधार सांपडत नाहीं. तथापि हें खरें आहे कीं, सरदार लालसिंग व झिंदन हीं दोघें धुलिपसिंगास बरोबर घेऊन जम्मू येथून लाहोरास आलीं; व त्यांनीं दरबारांत ढवळाढवळ करण्यास सुरवात केली. तेव्हां रणजित्‌सिंगाचें परमस्नेही जें कंपनीसरकार, त्यानें लाहोरास आपलें लष्कर तावडतोब पाठविलें. हें वर्त्तमान जम्मूराजे ध्यानसिंग व गुलाबसिंग ह्यांस कळतांच त्यांनीं इ. स. १८४८ त लाहोर येथें येऊन कदाचित् कंपनीसरकारानें लाहोर दरबाराबरोबर इ. स. १८०९ त जो स्नेहवर्धक तह केला आहे तो तें सरकार आतां विसरून जाऊन सर्व पंजाब खालसा करील म्हणून, व राजा लालसिंग व झिंदन यांनीं लाहोरास पुंडाई व झोटिंगपातशाही चालविली होती ती बंद व्हावी म्हणून, त्या उभयतांनीं धुलिपसिंगास त्याच्या आईजवळून घेऊन लाहोरच्या गादीवर बसविलें. ह्यावेळीं धुलिपसिंग ९ वर्षांचा होता. नंतर झिंदन व तिचा अंगिकार करणारा लालसिंग ह्यांस त्यांनीं तेथून हांकून दिलें. असो. ह्याप्रमाणें रणजितूसिंगाच्या मृत्यूनंतर पंजाबचें राज्य पुढें थोड्याच दिवसांनीं खालसा होण्याच्या बेतांत आलें असतां वरील दोघां जम्मू सरदारांनीं तें कांहीं दिवसपावेतों म्हणजे इ. स. १८४८ पर्यंत कसें तरी राखिलें, याबद्दल ते सरदार स्तुतीस पात्र आहेत यांत संदेह नाहीं. तसेंच कंपनीसरकारही ह्यावेळीं आपल्या वचनास जागृत राहिलें याबद्दल त्याचे जितके आभार मानावे तितके थोडेच आहेत.

येणेंप्रमाणें पंजाबचा राजा रणजित्‌सिंग ह्याच्या कारकीर्दीचा अल्पसा इतिहास, आम्हांस प्रस्तुत जी माहिती मिळाली तिजवरून, आम्ही आमच्या वाचकांस सादर

केला आहे. आणखी हेंही येथें नमूद करितों कीं, रणजित्सिंगासारखा लोभी मनुष्य त्यावेळीं जरी दुसरा कोणी नव्हता, व त्यामुळेंच त्यानें आपलें शीर लहानपणापासून हातांत घेऊन जीवापाड कष्ट सोसून पंजाबचें राज्य संपादिलें व अपार संपत्तीही मिळविली, तरी तो फार उदार अंतःकरणाचा मनुष्य होता असें म्हटल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. त्यानें आपल्या अमदानींत वरीच चैनबाजी करून आपल्या संपत्तीचा नाश केला होता तरी त्यानें धर्मकृत्याकडे व *नानखाना आणि †देराबाबा नानक, येथील त्याचे उपाध्ये व कुलगुरु वगैरे लोकांकरितां सुमारें पंचवीस पासून तीस लक्षांवर रुपयांचा खर्च केला होता. त्याचा प्रेत संस्कार कांहीं हिंदू व कांहीं मुसलमानी धर्माप्रमाणें करण्यांत आला.

समाप्त.

---

* हें शीख लोकांच्या पहिल्या गुरूचें जन्मस्थान. † हें रणजित्सिंगाचें कबरस्थान.

E/16